CMYK

LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही., ५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ४८ वा फोन २३०१०१ दिनांक १५ जानेवारी २०२६ गुरुवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# बीडमध्ये स्वीकृत सदस्याचा सहावा अर्ज घोळ घालणार
# भाजप, तुतारीचा १ तर घड्याळीचे २ सदस्य सेफ झोनमध्ये

**बीड दि.१४ (प्रतिनिधी):– येथील नगर परिषदेच्या उपाध्यक्ष पदाची आणि स्वीकृत सदस्यांची निवड आज होणाऱ्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये होणार आहे. बीड नगर पालिकेतील नगर सेवकांचे संख्याबळ पाहता ५ अर्ज स्वीकृत सदस्यासाठी आले असते तर ही निवडणूक एवढी किचकट झाली नसती. मात्र स्वीकृत सदस्यासाठी सहावा अर्ज दाखल झाल्यामुळे पाचव्या स्वीकृत सदस्यासाठी दोन जणांची लढत होईल, यात कोण बाहेर पडतं हे तांत्रिकदृष्ट्या मोजल्या जाणाऱ्या मुल्यावरुन ठरणार आहे. त्यामुळे सहावा अर्ज हा घोळ घालणार असल्याची चर्चा आहे.**



बीड नगर पालिकेच्या उपाध्यक्ष आणि स्वीकृत सदस्य निवडीसाठी आज पीठासीन अधिकाऱ्यांनी बैठक बोलाविली आहे. दुपारी १२ ते २ वाजेपर्यंत उपाध्यक्ष आणि स्वीकृत सदस्यांच्या निवडी होणार आहेत. उपाध्यक्ष पदासाठी अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून अमरनाना नाईकवाडे आणि विनोद मुळूक या दोघांच्या नावाची चर्चा आहे. पक्ष काय निर्णय घेतो ? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. उपाध्यक्ष पदासाठी ऐनवेळी तिसरेही नाव येऊ शकते अशी चर्चा आहे. प्राप्त माहितीनुसार उपाध्यक्ष पदासाठी पाच जणांना टप्प्याटप्प्याने संधी दिली जाणार आहे. त्यामुळे येत्या पाच वर्षात वर्षाला एक असा नवीन उपाध्यक्ष बीडकरांना पहायला मिळेल. पहिल्या एक वर्षाचा मान कोणाला मिळतो ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## या सहा जणांनी स्वीकृत सदस्य पदासाठी भरले अर्ज

बीड नगर परिषदेच्या ५ स्वीकृत सदस्य पदाच्या जागेसाठी ६ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामध्ये भाजपकडून रविंद्र कोंडिबा कदम, ॲड.गोविंदा नवनाथ शिराळे, बीड शहर विकास आघाडीकडून खान मसुद उमर आणि शिव-शाहु-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीकडून दिनेश हनुमानप्रसाद मुंदडा, सय्यद मोईन मास्टर, भीमराव वाघचौरे अशा ६ जणांनी अर्ज दाखल केले आहेत. भाजपकडून २, तुतारीकडून १ तर घड्याळीकडून ३ असे अर्ज भरण्यात आलेले आहेत.

## काकांचे आटोकाट प्रयत्न पण दोघांनीही नाकारले

अमृतकाका सारडा यांनी स्वीकृत सदस्य पद मिळावे यासाठी फिल्डींग लावली होती. दोन दिवसांपासून एवढी नावे चर्चेत असतांनाही काकांनी सदस्यत्व मिळावे यासाठी आटोकाट प्रयत्न केले मात्र भाजप नेत्या पंकजाताई मुंडे आणि डॉ.योगेश क्षीरसागर या दोघांनीही नाकारले. ताईंनी संधी दिली असती तरी ते आम जनतेला आवडले नसते. मोठ्या फरकाने पराभूत झाल्यानंतर त्यांचे हे आटोकाट प्रयत्न म्हणजे हात दाखवून अवलक्षण असेच आहे. काकांना आता कामच करावे लागणार आहे अशा प्रतिक्रिया सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होत आहे.

## अशी होईल स्वीकृत सदस्यांची निवड

बीड नगर पालिकेत पाच स्वीकृत सदस्य निवडूण द्यायचे आहेत. ५२ नगर सेवकांमधून ५ सदस्य निवडूण येतात. तौलीक संख्याबळाच्या आधारे १०.६ या प्रमाणे एका सदस्याच्या पाठिमागे संख्याबळ राहणे आवश्यक आहे. शिव-शाहु-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडी (घडी) ह गट २५ सदस्यांचा आहे. या संख्याबळाला १०.६ ने भागल्यास २.३५ हे मूल्य निघते. यामध्ये त्यांचे दोन सदस्य सहज निवडूण येतात. भाजपचा गट १५ नगर सेवकांचा आहे, त्यांचे मुल्य १.४१ निघते. त्यानुसार त्यांना १ सदस्य सहज मिळतो. तर बीड शहर विकास आघाडी (तुतारी) हा गट १३ नगर सेवकांचा आहे. त्यांचे मूल्य १.२२ निघते. त्यामधून त्यांचाही एक सदस्य सहज निवडूण येतो. पाचव्या सदस्यासाठी अपुर्णांकात राहिलेली संख्या गृहीत धरुन निवड केली जाते. घडीकडे ०.३५, भाजपकडे ०.४१ तर तुतारीकडे ०.२२ असे अपुर्णांक मूल्य आहे. नियमानुसार भाजपकडे अपुर्णांक मुल्य सर्वाधिक आहे, त्यामुळे त्यांचा आणखी एक सदस्य होऊ शकतो, असे तज्ञांचे मत आहे. मात्र नगर पालिकेच्या सभागृहात ऐनवेळी काय होईल हे आज दुपारपर्यंत समोर येईल.

## संजय गायकवाड यांना बेस्ट कॉन्ट्रॅक्टर तर संचेतींना बेस्ट आर्किटेक्ट अवार्ड

बीड दि.१४ (प्रतिनिधी):- बीड शहरामध्ये गेल्या ५० वर्षापासून बांधकाम व्यवसायामध्ये कार्यरत असलेले संजय गोपाळराव गायकवाड यांना एसीईपी या नामांकित कंपनीच्या वतीने उत्कृष्ट बांधकाम केल्या प्रकरणी बेस्ट कॉन्ट्रॅक्टर अवार्ड देण्यात आला आहे. प्रशांत संचेती यांना अल्ट्राटेक कंपनीच्या वतीने बेस्ट आर्किटेक्ट अवार्डने सन्मानित करण्यात आले. दि.१३ जानेवारी रोजी छत्रपती संभाजी नगर येथे हॉटेल हयात प्लेस या ठिकाणी हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. संजय गायकवाड हे गेल्या ५० पेक्षा जास्त वर्षापासून बांधकाम क्षेत्रात पान २ वर



## माजलगावात उपनगराध्यक्ष पदासाठी सहाल चाऊस यांचे नाव निश्चित

## पॅनल प्रमुखाच्या मुलांचीच स्वीकृत सदस्य म्हणून निवड ; कार्यकर्ते वाऱ्यावर



माजलगाव दि.१४(प्रतिनिधी):- माजलगाव नगर परिषदेच्या उपनगराध्यक्ष पदासाठी ज्येष्ठ नगरसेवक सहल यांचे नाव निश्चित झाले आहे तर नगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार) गटाचे पॅनल प्रमुख राहिलेल्या नेत्यांनी कार्यकर्त्यांना स्वीकृत सदस्यपद देण्याऐवजी स्वतःच्याच मुलांचीच शिफारस केल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी दिसून येऊ लागली.

येथील नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार) गटाच्या शिफा बिलाल चाऊस या नगराध्यक्ष झाल्यानंतर गुरुवार रोजी उपनगराध्यक्षपदाची आणि स्वीकृत सदस्यांची निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आली. स्वीकृत सदस्य म्हणून ज्या कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली त्यांना या पदावर घेतले जाते. परंतु या ठिकाणी पॅनल प्रमुख असलेले मोहन जगताप यांचे चिरंजीव विजय जगताप पान २ वर

## केज पंचायत समितीचा काळाबाजार

### विहीरी मंजुरीसाठी ७० हजारांची लाच घेताना सरपंच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

केज दि.१४ (प्रतिनिधी):- धाराशिव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बीडमध्ये मोठी कारवाई केली असून, केज तालुक्यातील तरणळी ग्रामपंचायतीच्या सरपंचाला रंगेहात पकडले आहे. महत्त्वाचे तपशील: आरोपी: महादेव प्रताप खेडकर (वय ३५), सरपंच - तरणळी, ता. केज यास. ७०,००० रुपये लाच स्विकारताना रंगेहात पकडल्यमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, नरेगा अंतर्गत सिंचन विहीर मंजूर करुन त्यावर बीडीओ आणि इतर अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या मिळवून देण्यासाठी आरोपीने लाच मागितली होती. तक्रारदाराने २३ डिसेंबर २०२५ रोजी अशी तक्रार दिली होती की, तक्रारदार आणि इतर तिघांच्या शेतात विहीर मंजूर करण्यासाठी प्रत्येकी २५ हजार या प्रमाणे पान २ वर

## आम्ही तुमची काळजी घेऊ

### नामदेव ढसाळ यांच्या पत्नी मल्लिका यांच्याशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा संवाद

बीड दि.१४ (प्रतिनिधी):- सुप्रसिद्ध कवी, लेखक, दलित चळवळीतील कार्यकर्ते पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या पत्नी आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रणी शाहीर अमर शेख यांच्या कन्या मल्लिका नामदेव ढसाळ या सध्या आजारी आहेत, त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याशी फोनवरुन संवाद साधला. आम्ही तुमच्या पाठिशी आहोत, तुम्हाला सर्वतोपरी मदत केली जाईल. नामदेव ढसाळ यांच्या कुटुंबाचे राज्यासाठी फार मोठे कार्य आहे. तुमच्या प्रकृतीत सुधारणा होईल, मी डॉक्टरांशी बोललो आहे. अजुन बरेचसे उपचार घेऊन तुम्ही बऱ्या व्हाल, काळजी करु नका, असा धीर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मल्लिका यांना पान २ वर



## मध्यरात्री बीड बायपासवर देवदूत बनून धावले पोलीस
# बंद पडलेली कार १ किमी ढकलून कुटुंबाला दिला आधार

बीड दि.१४ (प्रतिनिधी ):- 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याचा प्रत्यय देणारी एक हृदयस्पर्शी घटना बीड बायपासवरील मांजरसुंबा परिसरात मध्यरात्री घडली. पैठणहून आपल्या घराकडे परतणाऱ्या एका कुटुंबाची कार निर्जन स्थळी बंद पडली असता, गस्तीवर असलेल्या पोलीस पथकाने केवळ सुरक्षाच दिली नाही, तर चक्क एक किलोमीटर कार ढकलून ती सुरू करून दिली. पोलिसांच्या या संवेदनशीलतेमुळे एका मोठ्या संकटातून बचावल्याची भावना पाटोदा येथील पवार कुटुंबाने व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे पवार यांनी स्वतः याबाबत पवार सर धन्यवाद. तुमचे असे शिलेदार तुम्ही तुमच्या स्टाफमध्ये ठेवलेले आहेत... थँक्यू सर ! असा मेसेज सुद्धा एसपी साहेबांना पाठवून त्या पोलीस कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे. पाटोदा येथील रहिवासी अरुण संतराम पवार हे आपल्या पत्नी आणि पान २ वर

## बालूदेव रामडोहकर यांचे निधन




माजलगाव दि. १४ (प्रतिनिधी):- शहरातील झेंडा चौक भागातील जुन्या पिढीतील वे.शां.स. अनंत (बालूदेव) त्रिंबकराव रामडोहकर (वय ८३) यांचे दि.१४ बुधवारी सकाळी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सिंदफणा स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पान २ वर

## चांदीची एका दिवसात १४ हजारांची उसळी

नागपूर दि.१४ (वृत्तसेवा):- सोन्याच्या पावलावर पाऊल ठेवत चांदीनेही आता दरवाढीचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. नागपूरच्या सराफा बाजारात अवघ्या चार दिवसांत चांदीच्या दरात तब्बल ३२ हजार रुपयांची विक्रमी वाढ झाली असून, हा दर ३ टक्के जीएसटीसह २,८६,४४३ रुपयांच्या पान २ वर




CMYK

# श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान मंदिर गाभारा बांधकामासाठी सावरगाव ग्रामस्थांचा ३ कोटी रु. निधी देण्याचा संकल्प

## ■ पहिल्याच बैठकीत ६५ लाख रु. झाले जमा ■

**आष्टी दि.१५ ( प्रतिनिधी):- संपूर्ण भारत देशातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले नाथ संप्रदायाचे अग्रणी असलेल्या मच्छिंद्रनाथांना नाथांची संजीवन समाधी असलेल्या श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड देवस्थान येथील मंदिराचे गाभाऱ्याचे दगडी बांधकाम सुरू असून या कामासाठी स्थानिक सावरगाव ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने ३.०० कोटी रु.देणगी देण्याचा निश्चय केला असून.. याबाबत झालेल्या पहिल्याच बैठकीमध्ये ६५ लक्ष रु.जमा झाले आहेत.. श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे विश्वस्त आ.सुरेश धस यांनी घेतलेल्या सावरगाव ग्रामस्थांसमवेत घेतलेल्या विकास आढावा बैठकीमध्ये अशा प्रकारचा निर्णय झाल्याची माहिती श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे विश्वस्त ॲड. साहेबराव म्हस्के यांनी दिली..**

या बैठकीस विश्वस्त समितीचे अध्यक्ष दादासाहेब चितळे, सचिव बाबासाहेब रामभाऊ म्हस्के, उपाध्यक्ष बाबासाहेब महादेव म्हस्के, विश्वस्त रमेश बाबुराव ताठे पाटील, नवनाथ म्हस्के, सावरगाव ग्रामपंचायतचे सरपंच अर्जुन म्हस्के हे उपस्थित होते..

या विषयी अधिक माहिती देताना एडवोकेट साहेबराव म्हस्के म्हणाले की,

श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान मंदिराचा गाभारा हा आंध्र प्रदेश, कर्नाटक सीमेवरील दर्जेदार दगडातून निर्माण होत असून या कामासाठी सध्या ७३.०० कोटी रु.खर्चाचे अंदाजपत्रक असून ..आणखी ३ वर्षांनी हा खर्च १०० कोटी रुपये पर्यंत हा वाढू शकतो..

१०० १५० फूट आकाराचा हा गाभारा असून सुमारे १०९ फूट उंचीचा आहे हे काम संपूर्ण दगडी बांधकाम होणार आहे.. या कामासाठी तीन वर्ष कालावधी लागण्याचा अंदाज आहे..

सावरगाव येथील स्थानिक ग्रामस्थांनी या कामासाठी ३.०० कोटी रुपये निधी देण्याचा संकल्प केला असून या एकाच बैठकीमध्ये ६५ लाख रुपये निधी जमा झाला..

विशेष म्हणजे शेती अथवा इतर कोणतीही मालमत्ता नसणाऱ्या एका मजुरीवर गुजराण करणाऱ्या भाविक भक्ताने स्वतः हून १.०० लक्ष रुपये वर्गणी देण्याची जाहीर केले..

या देवस्थानचे निस्सीम भक्त आणि विश्वस्त असलेले आष्टी विधानसभा मतदारसंघाचे विधानसभा सदस्य आ.सुरेश धस यांनी स्वतःचे वैयक्तिक ५२.०० लक्ष रुपये निधी जाहीर केला असून त्यांच्या जामगाव येथील ग्रामस्थांकडून भरीव निधी जमा करण्याचे जाहीर केले आहे..

सावरगाव येथील या बैठकीवेळी वृद्धेश्वर ते धानोरा या रस्त्याच्या कामाची पाहणी करण्यात आली आणि सावरगाव गावाजवळील चौक हा १०० १०० फूट असा सर्कल तयार करण्यात येणार असून या कामामुळे सावरगाव या गावाचा कायापालट होणार आहे.श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाकडे सावरगाव येथून येणाऱ्या रस्त्यासह आणखी तीन रस्ते विकसित करण्यात येणार आहेत.. त्यामध्ये पहिला देवस्थान मंदिराकडून गवळी वाडा मार्गे वृद्धेश्वर कडे जाणारा, दुसरा शेंडगेवाडी मार्गे माणिक दौंडकडे जाणारा, आणि तिसरा मच्छिंद्रनाथ गड येथून श्रीक्षेत्र कानिफनाथ मंदिर मढी या गावाकडे जाणारा असे तीन रस्ते विकसित करण्यात येणार आहेत..

या सर्व रस्त्यांची पुरेशी रुंदी करण्यात येणार आहे.. त्यामुळे भाविक भक्तांना रहदारीसाठी सुविधा मिळणार असल्याचे सांगत सावरगाव चौकापासून ते श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मंदिरापर्यंत रस्त्यावरील पथदिव्यांची सोय करण्यात येणार आहे त्यामुळे रात्रीदेखील या रस्त्यावरून वाहतुकीसाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे अशी माहिती देखील एडवोकेट साहेबराव मस्के यांनी यावेळी दिली..

श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथील मंदिराचा गाभारा आणि इतर विकास कामे ही शेकडो वर्षे इतिहासाची साक्ष देणार आहेत त्यामुळे भाविक भक्तांनी सढळ हाताने या श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मंदिर गाभारा कामास आर्थिक मदत करावी असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# ७५ देशांच्या नागरिकांना अमेरिकेत प्रवेश बंदी

बीड दि.१५ (प्रतिनिधी):- अमेरिकेच्या विदेश मंत्रालयाने ७५ देशांतील नागरिकांसाठी व्हिसा प्रक्रिया थांबवली आहे. यामध्ये रशिया ,ब्राझील यांसारख्या देशांचा समावेश आहे. ट्रंप प्रशासनाच्या मते, या निर्णयामागे अमेरिकेत 'पब्लिक चार्ज' बनण्याची शक्यता असलेल्या अर्जदारांवर लक्ष ठेवणे हा मुख्य उद्देश आहे. या निर्बंधांची अंमलबजावणी २१ जानेवारीपासून अनिश्चित काळासाठी लागू होणार आहे.

बंदी का?

सरकारी मदतीवर अवलंबून राहण्याची शक्यता असलेल्या अर्जदारांना रोखण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. मंत्रालय आता व्हिसा स्क्रीनिंग आणि तपासणी प्रक्रियेचे पुनर्मूल्यांकन करेल. नवीन सुरक्षा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ही बंदी कायम राहील. असे परराष्ट्र मंत्रालयाच्या मेमोनुसार समोर येत आहे. परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॉमी पिगॉट यांनी सांगितले की, अमेरिकन जनतेचा फायदा घेऊन कल्याणकारी योजनांवर अवलंबून राहणाऱ्या लोकांना रोखण्यासाठी अमेरिका आपल्या जुन्या अधिकारांचा वापर करेल.

बीड दि.१५ :- शहरात अनेक नळांना तोट्या नसल्याने काम झाल्यावर त्यातील पाणी नळावाटे नालीत जात आहे. तरी न.प.ने याचा सर्व्हे करुन दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी अनेक नागरिकांनी केली आहे. यामुळे अनेक नागरिकांना पाणी मिळत नाही.

पान १ वरून

## संजय गायकवाड यांना बेस्ट कॉन्ट्रॅक्टर अवार्ड

आहेत. त्यांचे वडील गोपाळराव गायकवाड हे बीडमधील नामांकित बांधकाम व्यावसायीक-कॉन्ट्रॅक्टर होते. वडिलांची परंपरा संजय गायकवाड यांनी पुढे चालू ठेवत अल्पावधीतच बीड शहरात बांधकाम क्षेत्रात नावलौकिक केले आहे. बीड शहर आणि जिल्ह्यात अनेक ठिकाणी त्यांनी मोठमोठ्या साईट्स यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. त्यांच्या या व्यवसायातील कार्याबद्दल एसीईपी कंपनीने त्यांना आऊटस्टॅण्डींग कॉंक्रिट स्ट्रक्चर अवार्ड २०२५-२६ ने सन्मानित केले आहे. तर संचेती यांना त्यांच्या आर्किटेक्चरमधील कार्याबद्दल गौरविण्यात आले आहे. प्रशांत संचेती यांनी या क्षेत्रातील पदवी प्राप्त केल्यानंतर आपल्या प्रचंड मेहनतीने हे यश संपादन केले आहे. त्यांच्या कुटुंबात यापुर्वी कोणीही या क्षेत्रात कार्यरत नव्हते, स्ववळावर त्यांनी ही यशस्वी भरारी घेतली आहे.

या कार्यक्रमप्रसंगी एसीईपीचे प्रेसीडेंट इंजि. प्रशांत गाडगीळ, सचिव इंजि. राजन डागा, समन्वयक इंजि. प्रमोद सावंत, अल्ट्राटेकचे रिजनल हेड इंजि. बालकृष्ण कुलकर्णी, सेल्स हेड जसपालसिंह राहि, विभाग मॅनेजर इंजि. प्रसाद तापडिया हे उपस्थित होते. या दोघांच्या यशाबद्दल मित्र परिवार, आप्तेष्टांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## नामदेव ढसाळ यांच्या पत्नीशी मुख्यमंत्री फडणवीस यांचा संवाद

दिला आहे. यावेळी त्यांच्या पत्नी म्हणाल्या की, दुःख एवढंच आहे की, ज्यांनी नामदेव ढसाळ सारखा झंझावात जन्माला घातला त्यांच्या नावावर इतके लोक दुकाना थाटून बसलेले आहेत, त्यांचे फायदे घेतात पण नामदेव ढसाळचे कुटुंब कसे राहते ? ते जगतात की मरतात याचे कोणालाही देणं नाही. मुख्यमंत्री साहेब, तुमचं मन मोठं आहे. नामदेव ढसाळ यांनी जे केलं ते त्यांचं कर्तव्य होतं. यावर मुख्यमंत्री म्हणाले की, आम्ही सर्व जण तुमच्या बाजुने आहोत, तुमच्या सोबत आहोत, काळजी करु नका तुम्ही बऱ्या व्हाल. त्यांच्या या संवादाची व्हिडीओ क्लीप सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे.

## उपनगराध्यक्ष पदासाठी सहाल चाऊस यांचे नाव निश्चित

व बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक बाबुराव पोटभरे यांचे चिरंजीव अभिजीत पोटभरे यांची या पक्षाकडून शिफारस करण्यात आली. दुसरीकडे माजी आमदार डि.के. देशमुख यांचे पुतणे डॉ. सचिन सुधाकरराव देशमुख यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार)गटाकडुन आ. प्रकाश सोळंके यांनी शिफारस त्यांची निवड निश्चित झाली आहे. पॅनल प्रमुखांच्या मुलांची निवड झाल्याने त्यांचे कार्यकर्ते वाऱ्यावर दिसुन येऊ लागली आहे.

दोघांमध्ये तिसऱ्याचा फायदा

येथील आ.प्रकाश सोळंके यांना विधानसभा निवडणुकीत फायदा झाल्याने त्यांनी नगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यपदी त्यांच्या गटातून ब्राह्मण समाजाला उमेदवारी देण्याचे निश्चित केले. त्यानुसार ब्राह्मण समाजाने उमेश मोगरेकर यांची शिफारस केली परंतु आ. सोळंके गटात त्यांना विरोध झाल्याने कमलेश जाब्रस यांचे नाव पुढे आले होते, परंतु ऐनवेळी आ.प्रकाश सोळंके गटाकडून डॉ.सचिन देशमुख यांच्या नावाची शिफारस करण्यात आली.

## पोलिसांनी बंद पडलेली कार १ कि.मी.ढकलली

मुलांसह पैठण येथील कार्यक्रम आटोपून परतत होते. रात्री १ ते १.१५ च्या सुमारा बीड बायपास मार्गे मांजरसुंबा जवळ येत असताना अचानक त्यांची कार बंद पडली. निर्जन रस्ता आणि मध्यरात्रीची वेळ असल्याने पवार कुटुंब प्रचंड घाबरून गेले होते. सुरक्षिततेच्या कारणास्तव त्यांनी गाडीतच राहणे पसंत केले. अशातच गस्त घालत असलेले पोलीस उपनिरीक्षक गुंड, पोलीस कॉन्स्टेबल जाधव आणि चालक चव्हाण यांची नजर या उभी असलेल्या गाडीवर पडली.

सुरुवातीला घाबरलेल्या पवार कुटुंबाला पोलिसांनी धीर दिला. गाडी दुरुस्त करण्यासाठी जाधव यांनी तातडीने काही मेकॅनिकशी संपर्क साधला, मात्र इतक्या रात्री कोणीही येण्यास तयार नव्हते. रस्त्याने जाणाऱ्या इतर वाहनांकडेही मदत मागितली, पण यश आले नाही. अखेर परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आणि कुटुंबाची सुरक्षितता लक्षात घेता, पीएसआय गुंड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वतः गाडीला धक्का देण्याचा निर्णय घेतला. जवळपास एक किलोमीटरपर्यंत गाडी ढकलल्यानंतर अखेर ती गाडी सुरू झाली. 'अशा रात्री तुम्हाला आम्ही असुरक्षित सोडून जाऊ शकत नाही, हे पोलिसांचे शब्द ऐकून आम्हाला पोलीस रूपाने देवदूतच भेटल्यासारखे वाटले, अशा भावना अरुण पवार यांनी व्यक्त केल्या. जर त्यावेळी पोलीस आले नसते, तर चोरी किंवा इतर कोणताही अनुचित प्रकार घडू शकला असता, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. या कर्तव्यदक्ष कामाबद्दल अरुण पवार यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात जाऊन संबंधित तिन्ही पोलीस कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्याची इच्छा व्यक्त केली असून, बीड पोलीस दलाच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## बालूदेव रामडोहकर यांचे निधन

ज्योतिषकार सिद्धेश्वर रामडोहकर यांचे ते वडील होत. रामडोहकर परिवारावर कोसळलेल्या दुःखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## केज पंचायत समितीचा काळाबाजार...

१ लाख रुपयांची मागणी केज तालुक्यातील तरनळीचे सरपंच यानी केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांच्या पडताळणीत सखोल चौकशीनंतर असे निष्पन्न झाले की, सरपंचाने स्वतःच्या सहीसाठी १० हजार आणि बीडीओ व इतर अधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळवून देण्यासाठी उर्वरित तिघांकडून प्रत्येकी २० हजार, अशी एकूण ७० हजार रुपयांची मागणी केली. एसीबीच्या सापळ्याचा १ जानेवारी २०२६ रोजी पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर, अखेर १३ जानेवारी २०२६ मंगळवार रोजी सायंकाळी ७० हजार रुपये घेतानासरपंचाला ताब्यात घेण्यात आले. तक्रारदाराने २३ डिसेंबर २०२५ रोजी तक्रार दिली होती. या प्रकरणातील तक्रारदार व अन्य तिघांच्या शेतजमिनीत एम आर ई जी एस योजनेंतर्गत जलसिंचन विहीर मंजूर करून देण्यासाठी प्रत्येकी २५ हजार रुपये, असा एकूण १ लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप करण्यात आला होता. तक्रारीच्या अनुषंगाने २३ व २४ डिसेंबर २०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. त्यात सरपंच खेडकर यांनी विहिरीच्या प्रस्तावावर सही करून बीडीओ व इतर संबंधित अधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळवून देण्यासाठी तक्रारदाराकडून १० हजार व उर्वरित तिघांकडून प्रत्येकी २० हजार रुपये, असा एकूण ७० हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. १ जानेवारी २०२६ रोजी पहिली सापळा कारवाई करण्यात आली असता आरोपीने थेट रक्कम स्वीकारली नाही. त्यानंतर १३ जानेवारी २०२६ रोजी केज पंचायत समितीच्या पाठीमागील खेडकर यांच्या रुममध्ये सापळा कारवाई करण्यात आली. यावेळी तक्रारदाराकडून पंचासमक्ष ७० हजार रुपये स्वीकारताना तरनळीच्या सरपंचला ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी सरकारतर्फे फिर्याद पोलिस निरीक्षक विजय हनुमंत वगरे यांनी दाखल केली असून पुढील तपास बीड एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिट्टमल्ले यांच्यामार्गदर्शनाखाली निरीक्षक समाधान कवडे करत आहेत. ही घटना केज पंचायत समिती स्तरावर 'नरेगा' सारख्या कल्याणकारी योजनांमध्ये कशा प्रकारे आर्थिक देवाणघेवाण आणि एजंटगिरी चालते, हे अधोरेखित करते. पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्याच्या नावाखाली लाच मागितली गेल्याने या प्रकरणाचे धागेदोरे वरपर्यंत असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## चांदीची एका दिवसात १४ हजारांची उसळी

विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. लवकरच ३ लाखांची पातळी गाठण्याचा तज्ज्ञांचा अंदाज आहे.विशेष म्हणजे, मंगळवारच्या तुलनेत बुधवारी एकाच दिवसात चांदीत किलोमागे १४,१०० रुपयांची प्रचंड वाढ नोंदवण्यात आली. दरवाढीची आकडेवारी पाहता नववर्षात केवळ जानेवारी महिन्यातच चांदीत तब्बल ५०,८०० रुपयांची वाढ झाली. दरवाढीच्या या वेगामुळे गुंतवणूकदार आणि ग्राहकांचे डोळे विस्फारले आहेत.

का वाढताहेत चांदीचे दर ?

चांदीच्या या रॉकेट वेगामागे केवळ गुंतवणूक नाही, तर अनेक जागतिक आणि औद्योगिक कारणे कारणीभूत आहेत. सौर ऊर्जा आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीमध्ये चांदीचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढला आहे. जगभरात ग्रीन एनर्जीवर भर दिला जात असल्याने चांदीची मागणी औद्योगिक स्तरावर प्रचंड वाढली आहे. मागणीच्या तुलनेत जागतिक स्तरावर चांदीचा पुरवठा मर्यादित आहे. खाणींमधून होणारे उत्पादन संथ असल्याने बाजारात तुटवडा जाणवत आहे. याशिवाय जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता आणि वाढत्या महागाईपासून संरक्षण म्हणून गुंतवणूकदार आता सोन्यासोबतच चांदीला प्राधान्य देत आहेत. अनेक दिवसांपासून चांदीचे दर सोन्याच्या तुलनेत कमी होते. आता ही तफावत भरून काढण्यासाठी चांदीमध्ये जोरदार खरेदी दिसून येत आहे. नागपूरच्या बाजारातील स्थिती नागपूर हे मध्य भारतातील सोने आणि चांदीच्या व्यापाराचे मोठे केंद्र आहे. येथील बाजारात झालेली ही मोठी वाढ लग्नसराईच्या काळात ग्राहकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

पान ६ वरून

## पवनचक्की कंपन्यांना पाठीशी घालणाऱ्या प्रशासनाच्या

यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे, बाळासाहेब मोरे पाटील, राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोक येडे, कुलदीप करपे, रामधन जमाले,सुहास जायभाये, गणेश नाईकवाडे, राजू गायके, बाजीराव ढाकणे, अमोल पाठक आदी शेतकरीपुत्र मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

डॉ. ढवळे यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करत सांगितले की, शेतकऱ्यांची कोणतीही लेखी परवानगी न घेता थेट शेतजमिनीत विद्युत पोल उभारले जात आहेत.शेतातून बळजबरीने विद्युत लाईन व रस्ते तयार केले जात आहेत.योग्य मोबदला न देता किंवा न वटणारे धनादेश देऊन शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केली जात आहे.विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करून दडपशाही केली जात आहे. महसूल व पोलीस यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदेशीर जमीन अधिग्रहण सुरू आहे

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दि. २१ ऑक्टोबर २०१३ रोजी पवनऊर्जा प्रकल्पांसाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समित्या स्थापन केल्या आहेत. जिल्हाधिकारी – अध्यक्ष तर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व पोलीस अधीक्षक सदस्य आहेत

मात्र या समित्या केवळ कागदावरच अस्तित्वात असून शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. बीड तालुक्यातील महाजनवाडी, बोरखेड, कानडीघाट, गोलंग्री, चौसाळा, जाधववाडी, बेलगाव, खंडाळा, मुळूकवाडी, लिंबागणेश, वडवाडी तसेच पाटोदा तालुक्यातील धनगरजवळा, पाचेगाव, जवळाळा, बेडूकवाडी, वैद्यकिन्ही, दासखेड, बेनसूर, सोनेगाव येथील शेतकऱ्यांनी लेखी तक्रारी देऊनही एकही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचे आंदोलनात नमूद करण्यात आले. तेव्हा दोषी पवनचक्की कंपन्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत. शेतजमिनीत बेकायदेशीर उभारलेले विद्युत पोल व रस्ते त्वरित काढून टाकावेत. शेतकऱ्यांना योग्य व न्याय्य मोबदला द्यावा. जबाबदार महसूल व पोलीस अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी. अशी मागणी करून शेतकऱ्यांवरील अन्याय तात्काळ थांबवला नाही, तर पुढील काळात जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडले जाईल. याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील. असा इशारा संबंधित मंत्र्यांसह शासन प्रशासनाला निवेदनातून डॉ. गणेश ढवळे यांनी दिला आहे.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत राजमाता

यावेळी प्रमुख पाहुणे डॉ.राऊत साहेब, डॉ .चौरे साहेब , डॉ. सौरभ जाधव हे उपस्थित होते तसेच शाळेतील पालक मिसाळ साहेब, नागरगोजे साहेब, श्रीमती चापकानडे ताई, श्रीमती केदार ताई, श्रीमती क्षीरसागर ताई, श्रीमती अडागळे ताई, श्रीमती अंकुशे ताई यांच्या सह परिसरातील माता पालक यांचीउपस्थिती होती.यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्यावर आधारित मुलांनी भाषणे सादर करून स्त्रीशिक्षणाचे महत्त्व व समाजसुधारणेचा संदेश दिला.यानिमित्ताने आयोजित वेशभूषा उपक्रम हा विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरला. शाळेच्या आवारात विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक गाणी सादर केली... पालकांनीही विद्यार्थ्यांच्या या उपक्रमशीलतेचे कौतुक केले.कार्यक्रमांमध्ये डॉक्टर सौरभ जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांचे आणि शाळेचे नाते म्हणजे जय जिजाऊ जय शिवराय याप्रमाणे हे नाते आहे असे व्यक्त केले या सह शाळेच्या विविध उपक्रमास उपयुक्त अशी मदत देण्याचा मानस व्यक्त केला

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात जिजाऊ, विवेकानंद यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. तसेच अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे मत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वीर मॅडम यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती शेलार मॅडम तथा मदतनीस गायके मॅडम तसेच शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले शेवटी आभार प्रदर्शन माताडे सर यांनी केले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्र परिसर वृक्षलागवडी

पूर्वी कोरडा व मोकळा दिसणारा दवाखान्याचा परिसर आता हिरवीगार वनराईने बहरलेला असून, रुग्ण, नातेवाईक तसेच कर्मचारी यांना दिलासा देणारे वातावरण निर्माण झाले आहे. उन्हाळ्यात सावली, स्वच्छ हवा आणि मानसिक शांतता देणाऱ्या या झाडांमुळे प्राथमिक आरोग्य केंद्राचे रूपच पालटले आहे.डॉ. हरिदास शेलार यांनी केवळ वृक्षलागवड करून थांबले नाहीत, तर रोपांचे संगोपन, पाणीपुरवठा व संरक्षणाची जबाबदारीही स्वतः पुढाकार घेऊन पार पाडली. कोणतीही शासकीय मदत अथवा प्रसिद्धी न घेता त्यांनी राबवलेला हा उपक्रम खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवणारा आहे.या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता वाढली असून, अनेकांनी वृक्षलागवडीसाठी पुढाकार घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे. रुग्ण व नागरिकांकडून डॉ. हरिदास शेलार यांच्या कार्याचे मनापासून कौतुक होत असून, त्यांचा हा उपक्रम इतर सामाजिक कार्यकर्ते, संस्था व युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## स्वराज्यनिर्मितीचा पाया रोवला जिजाऊने–सज्जाद

स्वराज्य निर्मितीमध्ये राजमाता जिजाऊंचे अमूल्य योगदान राहिले शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले व त्यांच्या सोबत सहकारी शेख फातिमा यांनी परिश्रम घेतले. त्यांना आपण आदर्श स्थानी ठेवले पाहिजे यावेळी आपले अध्यक्ष शिवसेना काँग्रेस यांनीही सावित्रीबाई फुले जिजाऊ तसेच शेख फातिमा यांच्या कार्याचा गौरव करून आजच्या काळात त्यांचे आदर्श घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले, ह. भ. प. पांडुरंग महाराज पवळ मुख्याध्यापक खाडे सर, क्रांतिसिंह नाना पाटील मुख्याध्यापक टेकाळे सर, चव्हाण सर, दराडे सर, नागरगोजे सर, कादरी सर, पवळ सर ,नाईकवडे सर, आरसूळ मॅडम ,नागरगोजे मॅडम व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. वकृत्व स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनीने जास्तीत जास्त स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. एकूण ४१ मुला मुलींचे भाषणे झाली. व त्याचे बक्षीस वितरण १५ जानेवारी रोजी होणार आहे असे कळविण्यात आले.या कार्यक्रमाचे संचलन जोगदंड सर यांनी केले. व कार्यक्रमाचे प्रास्ताविक टेकाळे सर यांनी केले शेवटी सर्वांचे आभार खाडे सर यांनी मानले.

## त्रिदल आजी–माजी सैनिक संघटनेच्या

संघटना व जेथे आम्ही सैनिक घडवतो. अशा शिवनेरी अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. शिवनेरी करिअर अकादमीच्या प्रांगणात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात, मल्लविद्या संस्कार कुस्ती फाऊंडेशनचे अध्यक्ष उपमहाराष्ट्र केसरी बबन (काका) काशिद, जामखेड नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रांजल चिंतामणी, भाजपाचे गटनेते तथा नगरसेवक तात्याराम पोकळे, नगरसेवक मोहन पवार, नंदा होळकर, जया गव्हाळे, पोपट राळेभात, हर्षद काळे, प्रा. विकी घायतडक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नगरसेवक राजेंद्र गोरे व वसीम सय्यद वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेविका संगीता भालेराव यांचा यावेळी यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच पत्रकार दिनानिमित्त उपस्थित सर्व पत्रकारांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. याबरोबरच खेलो इंडिया मध्ये याबरोबरच खेलो इंडिया मध्ये मल्लखांब या खेळात सुवर्णपदक मिळविलेल्या कुमारी स्नेहल भोसले या खेळाडूचाही यावेळी सत्कार करण्यात आला.वरील सर्व मान्यवरांबरोबरच शिवसेना तालुकाप्रमुख प्रा. कैलास माने, स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रविण होळकर, माजी ग्रामपंचायत सदस्य इस्माईल सय्यद,समता मित्र मंडळाचे अध्यक्ष संतोष गव्हाळे, सागर टकले, बबलू टेकाळे, माजिद कुरेशी, अशोक शेळके, डॉ. कैलास हजारे आदी मान्यवरांबरोबरच पत्रकार, त्रिदल आजी माजी सैनिक संघाचे अध्यक्ष कॅप्टन लक्ष्मण भोरे, उपाध्यक्ष कांतीलाल कवादे, सचिव शहाजी ढेपे, कोषाध्यक्ष राजकुमार भराटे, सल्लागार सुग्रीव अडाले, मार्गदर्शक अरविंद जाधव, संचालक हरिभाऊ कदम, अमोल राऊत, पोपट सांगळे, सदस्य दत्तात्रय डिसले, बाळू कोठाळे, गणेश कदम, मच्छिंद्र माने, संजय गायकवाड, नंदकुमार नागवडे, अंकुश ढवळे, रावसाहेब कापसे, रवींद्र शेळके, बाळू नेमाने, दामोदर राऊत, बबन नाईक, श्रीराम राळेभात, व शिवनेरी अकॅडमीतील प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना जामखेड नगर परिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी म्हणाल्या की, ज्यांनी हिंदवी स्वराज्याची ज्योत पेटवली अशा राजमाता जिजाऊंच्या विचारातून जामखेड शहराचा कारभार करताना सर्वच नगरसेवकांना विश्वासात घेऊन, जामखेड शहराच्या सर्व योजना पाणी, वीज, रस्ते, स्वच्छता, अशी सर्व कामे करण्याबरोबरच निवडणुकीत त्रिदल आजी– माजी सैनिक संघटनेला दिलेल्या आश्वासनानुसार विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड शहरात एक सैनिक भवन उभारण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असे आश्वासनही नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी यांनी दिले.प्रास्ताविक कांतीलाल कवादे, सूत्रसंचालन सैनिक संघाचे सचिव शहाजी ढेपे तर आभार कॅप्टन लक्ष्मण भोरे यांनी मानले

## तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी उगले सचिवपदी

नवीन कार्यकारणी जाहीर करण्यासाठी जिल्हाउपाध्यक्ष दिलीप झगडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत तालुका पत्रकारसंघाच्या अध्यक्षपदी पांडुरंग उगले यांची तर, सचिवपदी राज गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.या बैठकीला मावळते अध्यक्ष हरीश यादव, मावळते सचिव रत्नाकर कुलथे, संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप झगडे, सुभाष नाकलगावकर, पुरुषोत्तम करवा, ज्येष्ठ मार्गदर्शक सुधीर नागापुरे,वैजनाथ घायतिडक यांच्यासह सर्व पत्रकार उपस्थित होते.या निवडीबद्दल नूतन पदाधिकाऱ्यांचे सर्वांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## गेवराई गटशिक्षणाधिकारीपदी प्रवीण काळम यांची

शैक्षणिक चर्चासत्र आणि बैठकासाठी त्यांना राज्यस्तरावरून निमंत्रित केले जाते. गेवराई तालुक्यातील राक्षसभवन बीटमध्ये त्यांनी विविध शैक्षणिक उपक्रम राबवले आहेत. शांत, संयमी आणि कार्यतत्पर असलेल्या काळम यांच्याकडे पदभार दिल्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## पाटोदा शहराच्या विकासासाठी प्लानटेरा कंपनीच्या

नगरपंचायत कार्यालयात नगराध्यक्ष राजूभैय्या जाधव यांच्या हस्ते अधिकाऱ्यांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला.या प्रसंगी आमदार सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे, नगरपंचायत कार्यालयीन अधीक्षक प्रेमकुमार मस्के, अभियंता राहुल टाळके, पत्रकार ॲड. महेश बेद्रे, श्रीनिवास राऊत, महेश भाकरे, काकासाहेब जाधव पाटील, लक्ष्मण वाघमारे, बाजीराव आढागळे यांच्यासह कार्यकर्ते, अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.अमित पोखरणा आणि विजयकुमार सोले यांनी आमदार सुरेश धस व प्राजक्ता काकू धस यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा शहरात विविध ठिकाणी नियोजनबद्ध व आकर्षक विकासात्मक रचना उभारली जाईल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ॲड. महेश बेद्रे यांनी केले तर आभार नगराध्यक्ष राजूभैय्या जाधव यांनी मानले.

## १८ जानेवारीच्या शासकीय योजना महाशिबिरासाठी

योजनांचा लाभ मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या संकल्पनेतून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, जिल्हाधिकारी कार्यालय बीड तसेच तालुका विधी सेवा समिती पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने या महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी न्यायालयीन पातळीवरून सातत्याने नियोजन व आढावा घेण्यात येत आहे. पाटोदा न्यायालयाचे न्यायाधीश मा. एम. ए. शिंदे तसेच सहन्यायाधीश मा. सौ. एस. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण पूर्वतयारीचा आढावा घेतला जात असून कार्यक्रमातील प्रत्येक बाबीवर बारकाईने लक्ष दिले जात आहे. न्यायालयीन कर्मचारी तसेच पाटोदा वकील संघाचे पदाधिकारी व सदस्यही मोठ्या परिश्रमाने या कामात सहभागी झाले आहेत.महाशिबिराच्या पार्श्वभूमीवर पाटोदा शहर व तालुक्यातील प्रमुख चौक, रस्ते व सार्वजनिक ठिकाणी बॅनर व फ्लेक्स लावण्यात आले असून फलकांद्वारे नागरिकांना माहिती दिली जात आहे. माहितीपत्रिकांचे वाटप सुरू असून रिक्षाद्वारे अनाउन्सिंग करून नागरिकांपर्यंत कार्यक्रमाची माहिती पोहोचवली जात आहे.या महाशिबिरात तहसील कार्यालय पाटोदा, पंचायत समिती पाटोदा, नगर पंचायत पाटोदा, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, एस.टी. महामंडळ विभाग, एसबीआय बँक पाटोदा, वन विभाग, महिला व बाल विकास विभाग, सामाजिक कल्याण विभाग, एमएससीबी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पशुसंवर्धन कार्यालय तसेच जलसंधारण कार्यालय यांच्या वतीने विविध शासकीय योजनांचे स्टॉल लावण्यात येणार आहेत. या स्टॉलच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजना, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री स्वनिधी योजना (झच् डत–छळवहळ), आयुष्मान भारत कार्ड, रक्तदान शिबिर, शिष्यवृत्ती योजना, बचत गट योजना, कृषी व सूक्ष्म सिंचन योजना, पशुसंवर्धन व जलसंधारण विषयक योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात येणार आहे.या शासकीय योजना महाशिबिराचा लाभ पाटोदा शहर व तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले आहे.

## राष्ट्राच्या सर्वांगीन प्रगतीमध्ये संविधानाची भूमिका

रुजवण्याचा प्रयत्न केला. समरसतेचा विचार समाजामध्ये पेरला. महिला, कामगार वर्ग यांच्या हक्कासाठी नियम कायदे तयार केले. रूढी, अंधश्रद्धा यांच्या पाशातून समाजाची मुक्तता केली. प्रा. चंद्रकांत मुळे म्हणाले की विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिल्यामुळे विद्यापीठाची उंची वाढली आहे. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने चालणाऱ्या विद्यापीठाचा आज मोठा भौतिक विस्तार झाला आहे. अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन आपले करिअर घडवत आहेत. अध्यक्षीय समोरापात सत्यनारायण लोहिया म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोरगरिबांसाठी शिक्षणाची दारे खुली केली.सर्व जाती–धर्मांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सोपान सुरवसे यांनी केले.आभार विद्यार्थी विकास मंडळाचे प्रभारी डॉ. गंगाधर उशमवार यांनी मानले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या विविध ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तिकर यांनी मान्यवरांना ग्रंथ प्रदर्शनाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राम गव्हाणे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## बाल लैंगिक अत्याचार प्रकरणात कोर्टाने ठोकली सुंदर

आला होता.या गुन्ह्याचा सखोल तपास पिंक पथकाच्या महिला पोलीस उपनिरीक्षक अर्चना भोसले यांनी केला. तपासात सहाय्यक पोलीस फौजदार भगवान खाडे, पोलीस हवालदार महेश झिकरे व महिला पोलीस अंमलदार ज्योती साळुंखे यांनी मोलाचे सहकार्य केले. तपास पूर्ण झाल्यानंतर दोषारोपपत्र सत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.न्यायालयात सरकार पक्षाने सादर केलेले साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल व अन्य ठोस पुरावे ग्राह्य धरत, मुख्य आरोपी सुंदर निवृत्ती तायड (वय ३८, रा. रामपुरी, ता. गेवराई) याच्यावरील आरोप सिद्ध झाल्याने त्याला दोशी ठरवत वरील प्रमाणे शिक्षा ठोकली.या खटल्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस अंमलदार अनुराधा गव्हाणे आणि अयोध्या खाडेयांनी कोर्ट पैरवी म्हणून प्रभावी भूमिका बजावली. फिर्यादीकडून भक्कम पुरावे मुद्देसूद मांडणी करत ॲड.भागवत राख सहाय्यक सहकारी अभियोक्ता व ॲड. तेजस सुभाष नेहरकर फिर्यादी चे वतीने यांनी कामकाज पाहिले. त्यांना सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड.अजय राख,ॲड.अविनाश गंडले यांचे मार्गदर्शन लाभले. या निकालामुळे पीडित चिमुकलीला न्याय मिळाला असून, बाललैंगिक अत्याचार प्रकरणांत कोणतीही तडजोड होणार नाही, असा ठाम आणि कडक संदेश समाजात गेला आहे. या यशस्वी कामगिरीसाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी कटके यांचे मार्गदर्शन लाभले.

## नगरपरिषदेतील व्यापाऱ्यांचा इशारा

आठवड्यात तीन वेळा स्वच्छता करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.मात्र, कर्मचाऱ्यांना वेळोवेळी सूचना दिल्यावरही ते परिसर स्वच्छ न करता निघून जात असल्याचा आरोप आहे. यामुळे २०० ते ३०० भाजी विक्रेते सुभाष रोड आणि नगरपालिका समोरच बसून व्यवसाय करतात, ज्यामुळे रहदारीला अडथळा होतो आणि नागरिकांना त्रास होतो. पूर्वी अर्ज दिल्यावरही काहीच हातकळी झालेली नाही, त्यामुळे व्यापारी आता तीव्र पावले उचलण्यास तयार झाले आहेत. स्वच्छता न झाल्यास पुढील रविवारी नगरपरिषद कार्यालयासमोर बाजार भरविणार आहोत. सुभाष रोडवर दुकाने लावणार किंवा पालिकेसमोरच मंडई भरविणार, असा इशारा व्यापाऱ्यांनी दिला आहे.या घाणीच्या समस्येने शहरातील बाजारपेठा अस्वच्छ झाल्या असून, ग्राहकवर्गही कमी होत आहे. मोकाट जनावरांमुळे बाजारात चोहीकडे शेण सापडते, ज्यामुळे दुर्गंधी वाढते. व्यापाऱ्यांनी नगरपरिषद प्रशासनाला तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती केली असून, अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे. नगरपरिषद प्रशासनाकडून अद्याप यावर कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.या प्रकरणाने शहरातील व्यावसायिक आणि नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. स्वच्छता ही मूलभूत जबाबदारी असताना ती पार पडत नसल्याने व्यापाऱ्यांचा असंतोष वाढत आहे. नगरपरिषदेला आता ठोस पावले उचलावी लागणार आहेत.स्वच्छता करा, नसता रविवारी पालिकेसमोर बाजार भरविणार!बीड नगरपरिषद हद्दीतील व्यापाऱ्यांनी घाणीच्या तीव्र विरोधात इशारा दिला आहे. आठवडी बाजार, भाजी मंडईतील अस्वच्छतेमुळे रोगराईचा धोका वाढला असून, कर भरणाऱ्या व्यापाऱ्यांना त्रास होतोय. मोमीनपूरा, पालवन चौक, राजीवगांधी चौक आदी भाग स्वच्छ करा, अन्यथा रविवारी नगरपरिषद कार्यालयासमोर बाजार! भाजी विक्रेत्या व शेतकऱ्यांनी दिला.

## ज्येष्ठ पत्रकार रईस खान यांना राज्यस्तरीय

आले. या पुरस्काराचे वितरण रविवार,१८ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हैदर गार्डन फंक्शन हॉल माल टेकडी रोड, देग्लूर नाका नांदेड येथे एका समारंभात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याचे संस्थेच्यावतीने सांगण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी



## सुशीलाबाई पुराणिक यांचे निधन



बीड दि १४ (प्रतिनिधी)- श्रीकृष्ण नगर, नेत्रधाम परिसर येथील रहिवासी सुशीलाबाई दत्तात्रय पुराणिक (वय ७५) यांचे विवेकानंद हॉस्पिटल येथे उपचार सुरू असताना निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे व एक मुलगी असा परिवार आहे. सफदर अली विद्यालयाचे शिक्षक कालिदास पुराणिक तसेच जिल्हा न्यायालयातील कर्मचारी गणेश पुराणिक यांच्या त्या मातोश्री होत.त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून अनेकांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

## पीर ओ मुर्शिद हज़रत सय्यद रौशन मुनवर यांचे निधन



बीड दि १४ (प्रतिनिधी) - महेदवीया समाजाचे पीर ओ मुर्शिद हज़रत सय्यद रौशन मुनवर यांचे दि.१२ जानेवारी २०२६ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्षे होते. महेदवीया समाजाचे पीर ओ मुर्शिद असल्याने बीड शहरातील महेदवीया दायरा कब्रस्तानची बकाल अवस्था दूर करणे व कब्रस्तानच्या संरक्षक भिंती बांधून घेण्यासाठी ते येत्या रमजान महिन्याच्या १९ तारखेला महेदवीया दायरा येथे असलेल्या हज़रत बंदगी मियाँ सय्यद शाह आलम (रहमतुल्ला अलैह) दरगाहच्या उर्स साठी बीडला येऊन आ. संदीप क्षीरसागर, नगराध्यक्षा प्रेमलता ताई पालवे यांची भेट घेणार होते. त्यांच्या निधनामुळे त्यांची व या दोन्ही नेत्यांची भेट होऊ शकली नाही. अशी माहिती दायरा कब्रस्तानसाठी लढा देणारे त्यांचे मुरीद तथा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिली आहे. हज़रत रौशन मियाँ यांना दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांना हैदराबाद येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तिथे उपचार सुरू असताना दिनांक १२ जानेवारी रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांची नमाज़ ए जनाज़ा हैदराबाद शहरातील चंचलगुडा येथे असलेल्या जामिया मस्जिद ए मुनव्वरिया येथे पठण करण्यात आली तर दफन विधी शहीदों का हज़िरा येथे करण्यात आला. यावेळी हैदराबाद शहरासह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातून त्यांचे मुरीद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडचा सिद्धांत गायकवाड याचा खून केल्यावरून अक्षय व सचिन गायकवाड यांना जन्मठेपेची शिक्षा

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद एल यावलकर यांचा निकाल

बीड दि.१४ (प्रतिनिधी) -बीड शहरातील बीड गाजलेल्या खून खटल्यात बारादरी यादव मळा माळवी येथील रहिवासी सिद्धांत किरण गायकवाड यास जुन्या वादावरून पळवुन नेवुन त्याचा खुन केल्याचा गुन्हा सिध्द झाल्यावर पातुर गल्ली माळवी बीड येथील रहिवासी अक्षय उर्फ चिंटु मिंटू गायकवाड व अभिषेक सचिन उर्फ पिंटु गायकवाड रा. बालाजी नगर, नांदेड यांना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद एल यावलकर बीड यांनी दि. १३ जानेवारी २०२६ रोजी दोषी ठरवुन जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

प्रस्तुत प्रकरणातील हकीकत अशी की, फिर्यादी किरण गायकवाड रा. बारादरी, यादवमळा, बीड यांचा मुलगा सिद्धांत किरण गायकवाड, वय २० वर्ष यास जुन्या वादाच्या कारणावरून त्याच्या घरापासुन दिनांक २ जुलै २०२२ रोजी दुपारी ३.३० वा सुमारास आरोपी अक्षय उर्फ चिंटु मिंटू गायकवाड व अभिषेक सचिन उर्फ पिंटु गायकवाड यांनी मोटार सायकलवर बसवुन घेवुन जाउन खंडेश्वरी, बीड परिसरातील जिजामाता विद्यालयातील पडक्या रूममध्ये घेवुन जाउन तेथे त्यास लाकडी काठयाने व बेल्टने जिवे मारण्याच्या उद्देशाने जबर मारहाण केली. या कारणावरून उपरोक्त फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरून बीड शहर पोलीस स्टेशन येथे गुर कं १०७/२०२२ कलम ३०७,३६४,३४ भादवी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर जखमी यास सुरवातीला काकु नाना हॉस्पिटल, बीड व नंतर ससुन हॉस्पिटल, पुणे येथे दाखल करण्यात आले होते व उपचारा दरम्यान त्याचा मृत्यु झाल्यावरून प्रकरणात कलम ३०२ भादवी वाढवण्यात आले.सदर गुन्हयाचा तपास पी.यु अंधारे, पोलीस उपनिरीक्षक, बीड शहर पोलीस स्टेशन यांनी केला. गुन्हयाच्या तपासाच्या कामी दोन्ही आरोपींना अटककरण्यात आली .त्याचबरोबर साक्षीदाराचे जबाब व इतर परिस्थितीजन्य पुरावा मिळुन आल्यावरून दोन्ही आरोंपी विरूध्द प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बीड यांच्याकडे आरोप पत्र दाखल करण्यात आले व त्यानंतर सदरचे प्रकरण हे सुनावनी साठी सत्र न्यायालय बीड येथे वर्ग करण्यात आले. सदर प्रकरणाची सुनावणी तात्कालीन जिल्हा व सत्र न्यायाधीश के. आर. जोगळेकर स व त्यानंतर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद एल. यावलकर बीड यांच्या समोर झाली. सदर प्रकरणी आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकार पक्षातर्फे एकुण १५१५ साक्षीदार तपासण्यात आले. प्रकरणात फिर्यादी व साक्षीदार यांचे जबाब, वैद्यकिय पुरावा व इतर परिस्थीतीजन्य पुरावा यांचे अवलोकन करून व जिल्हा सरकारी वकिल तथा शासकीय अभियोक्ता ॲड. अजय दि. राख यांचा युक्तीवाद ग्राहय धरून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद एल. यावलकर यांनी दोन्ही आरोपी अक्षय उर्फ चिंटु मिंटू गायकवाड रा. पात्रुड गल्ली, माळिवेस, बीड व अभिषेक सचिन उर्फ पिंटु गायकवाड रा. बालाजी नगर, नांदेड यांना भादवी कलम ३०२,३४ प्रमाणे दोषी धरून जन्मठेपेची शिक्षा सुनावली तसेच भादवी कलम ३६४,३४ प्रमाणे दोषी धरून ७ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे व दोन्ही शिक्षा एकत्रित भोगायची आहे. सदर प्रकरणी सरकारपक्षातर्फे जिल्हा सरकारी वकिल तथा शासकीय अभियोक्ता ॲड. अजय दि. राख यांनी काम पाहिले. त्यांना सहा. सरकारी वकिल बी.एस.राख, व सहा. सरकारी वकिल ए.बी. तिडके व फिर्यादी तर्फे ॲड. एस.एस. सावंत यांनी सहकार्य केले. सदर प्रकरणात पैरवी अधिकारी म्हणून पोलीस कर्मचारी सुरेश कदम व एम. व्ही नागमवाड यांनी सहकार्य केले.

## तीन मुली झाल्या म्हणून छळ चालवल्याने विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

केज दि १४(प्रतिनिधी) -तुला तीन मुलीच झाल्या आमच्या वंशाला दिवा नाही, अशी सतत हिणवणूक करत शारीरिक व मानसिक छळ केल्यावरून २५ वर्षे वयाच्या अरुणा उद्धव ठोंबरे नामक विवाहितेने फॅनला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना केज तालुक्यातील उंदरी येथे घडली. या घटनेने चिमुकल्या मुली मात्र उघड्या पडल्या आहेत तर या प्रकरणी पती, सासू व सासऱ्यां विरोधात युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार लातूर जिल्ह्यातील आजरखेडा ता. रेणापूर येथील प्रकाश सूर्यवंशी यांची मुलगी अरुणा हिचा विवाह १६ ऑगस्ट २०१९ रोजी त्यावेळी बँकेत नोकरीस असलेल्या केज तालुक्यातील उंदरी येथील उद्धव ठोंबरे याच्याशी झाला होता. या दाम्पत्याला राजनंदिनी वय ५ तसेच आर्या व अपूर्वा वय ४ अशा जुळ्या मुलींसह एकूण ३ मुली झाल्या. तीन मुली झाल्याच्या कारणावरून पती उद्धव ठोंबरे दारूच्या नशेत अरुणाला शिवीगाळ व मारहाण करीत असल्याचा आरोप नातेवाइकांनी केला आहे. तसेच सासू इंदूबाई ठोंबरे व सासरे उत्तम ठोंबरे हे आम्हाला मुलगा हवा होता तू आमचा वंश बुडविलास, असे म्हणत तिला मानसिक त्रास देत होते. या छळाबाबत अरुणा ठोंबरे हिने वेळोवेळी आई-वडील, भाऊ गोविंद सूर्यवंशी तसेच मोठी बहीण करुणा यांना फोनवरून तसेच माहेरी आल्यानंतर माहिती दिली होती. अखेर सततच्या छळाला कंटाळून अरुणा ठोंबरे हिने १० जानेवारी रोजी दुपारी सुमारे २ वाजता उंदरी येथील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी मयत अरुणाचा भाऊ गोविंद सूर्यवंशी यांच्या तक्रारीवरून युसुफवडगाव पोलीस ठाण्यात पती उद्धव ठोंबरे, सासू इंदूबाई ठोंबरे व सासरे उत्तम ठोंबरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उप निरीक्षक भारत बरडे हे पुढील तपास करीत आहेत.

## एमआयआयटी महाविद्यालयामध्ये विद्यापीठाचा नामविस्तार दिन साजरा

बीड दि.१४ (प्रतिनिधी)- बीड येथील एमआयआयटी महाविद्यालयामध्ये दि. १४ जाने. २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. जोजो जोसेफ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. अध्यक्षीय भाषणात बोलताना प्राचार्य साहेबांनी नामांतर लढा आणि चळवळ या विषयावर विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी कार्यक्रमामध्ये प्रा. शेख साबेर सर, प्रा. मयुरेश गावरस्कर सर, प्रा. संजीवनी पवार, मुकेश ससाणे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकेश ससाणे यांनी केले.

## बीड जिल्ह्याचा इतिहास पोहोचणार घरोघरी जिल्ह्याच्या इतिहासावर प्रज्ञाशोध परीक्षा

बीड दि १४ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्याच्या विषयी राज्यभर नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त होत असतानाच बीड जिल्ह्याच्या वैभवशाली इतिहासाचे नव्या पिढीला ज्ञान व्हावे व शालेय विद्यार्थ्यांना बीड जिल्ह्याचा वैभवशाली इतिहास कळावा या ध्येयाने आता बीड जिल्हा इतिहास परिषद सरसावली असून परिषदेने शालेय स्तरावर जिल्ह्याच्या इतिहासाच्या प्रचारासाठी बीड जिल्हा इतिहास प्रज्ञाशोध परीक्षेचे आयोजन केले आहे. या परीक्षा सर्व तालुक्यातून शालेय विद्यार्थ्यांसाठी गोष्ट बीड जिल्ह्याच्या इतिहासाची या बीड इतिहास विषयक पुस्तकावर आधारित होणार असून परीक्षेत सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना हे मौल्यवान पुस्तक विनामूल्य दिले जाणार आहे. परीक्षेला बीड शहरात पहिल्या टप्प्यात प्रचंड प्रतिसाद मिळाल्याची माहिती जिल्हा इतिहास परिषदेचे अध्यक्ष सतीश साळुंके यांनी दिली.या पुस्तक प्रकाशनासाठी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी अर्थसाह्य केल्याबद्दल परिषदेने त्यांचे आभार मानले आहेत.गोष्ट बीड जिल्ह्याच्या इतिहासाची या पुस्तकात बीड जिल्ह्याच्या प्राचीन काळापासून ते हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रापर्यंतचा सूत्रबद्ध इतिहास मांडण्यात आला असून शालेय विद्यार्थ्यांना समजेल अशा सोप्या भाषेत हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचे आगळे वेगळे महत्त्व आणि वैशिष्ट्य म्हणजे बीड जिल्ह्यातील विविध प्राचीन व मध्ययुगीन अशा १४ स्थळांचे व्हिडिओ क्यू आर कोडच्या रूपाने या पुस्तकात समाविष्ट केले आहेत. म्हणजे वाचक ज्या स्थळाची माहिती वाचतोय त्या स्थळाचे व्हिडिओ वाचकांना मोबाईलवर स्कॅन करून दिसू शकतील. हा इतिहास लेखनातील अभिनव प्रयोग असल्याचे मत या पुस्तकाचे लेखक डॉ. सतीश साळुंके यांनी सांगितले. या बीड जिल्हा इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा दहावी आठवी ते दहावी व पाचवी ते सातवी अशा दोन गटात होतील दोन्ही गटाला रोख रखमेची बक्षीस, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र दिली जातील. तसेच परीक्षेत बसणारा प्रत्येक विद्यार्थ्याला हे पुस्तक मोफत दिले जाणार आहे. या परीक्षा ४ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार असून बीड शहरातील पहिल्या टप्प्यात सर्व शाळांमधूनेत परीक्षेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यामुळे बीडचा इतिहास घरोघरी पोहोचणार आहे. ज्या शाळांना या प्रज्ञाशोध परीक्षा आयोजित करायचे आहे त्यांनी डॉ. सतीश साळुंके यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन बीड जिल्हा इतिहास परिषदेने केले आहे.




# सोनीमोहा येथील डॉ.तोंडे यांना ८ लाखाला गंडा घालणाऱ्या भामट्या सौरभ कुलकर्णीला बेड्या

## केज पोलिसांची कराडमध्ये जाऊन प्रशासकीय कारवाई

केज दि १४ (प्रतिनिधी)- सुमारे ३ कोटी ८६ लाख ६१ हजार रुपयांच्या फसवणुकीच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपी सौरभ सुहास कुलकर्णी राहणार नागपूर याला केज पोलिसांनी कराड (जि. सातारा) येथून अटक केली आहे. मंगळवारी पहाटे चारच्या सुमारास एका खाजगी ट्रॅव्हल्सने प्रवास करत असताना ही कारवाई करण्यात आली.

याबाबत सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, धारूर तालुक्यातील सोनिमोहा येथील तक्रारदार डॉ. अविनाश रामचंद्र तोंडे हे सध्या बारामती येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अशी तक्रार दिली होती की, आरोपी सौरभ कुलकर्णी याची डॉ. तोंडे यांच्याशी फेसबुकच्या माध्यमातून ओळख झाली होती. आरोपीने त्यांना मॅनेजमेंट कोठ्यातून एमडी मेडिसिन ला प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवले. एमडी पूर्ण करण्यासाठी ३ वर्षांची फी ९९ लाख रुपये असल्याचे सांगून ६५ लाखांत प्रवेश मिळवून देण्याचे आश्वासन आरोपी सौरभ कुलकर्णीने दिले. यासाठी आरोपीने डॉ. तोंडे यांच्याकडून रोख आणि फोन-पे द्वारे एकूण ८ लाख रुपये घेतले. हा व्यवहार झाल्यानंतर जेव्हा पहिल्या यादीत डॉ. तोंडे यांचे नाव निवड यादीत आले नाही, तेव्हा त्यांनी आपल्या पैशांची परत मागणी केली. मात्र, आरोपी सौरभने पैसे परत करण्यास नकार दिला आणि ''जे करायचे ते करुन घे'' अशी धमकी डॉक्टर तोंडे यांना दिली. याप्रकरणी ९ डिसेंबर २०२५ रोजी धारुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम करत होते. गुन्हा दाखल झाल्यापासून पोलीस आरोपीच्या शोधात होते. दरम्यान, आरोपी बेंगळुरुहून कराडमार्गे पुण्याला जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार मंगळवारी पहाटे कराड येथे ट्रॅव्हल्सची झडती घेऊन पोलिसांनी सौरभला ताब्यात घेतले. . सौरभ कुलकर्णी हा सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले असून, त्याच्यावर महाराष्ट्रासह इतर राज्यांतील एकूण १५ पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल आहेत. यात प्रामुख्याने खालील ठिकाणांचा समावेश आहे: नाशिक (वाडा), सोलापूर (टेंभुर्णी, विजापूर नाका), जालना (चंदनझिरा, घनसावंगी), नागपूर (धंतोली, हुडकेश्वर), पुणे (खडकी), मुंबई (दहिसर). तसेच



अमृतसर (पंजाब), देसा सिटी बनास फाटा (गुजरात) आणि धारुर (बीड) येथेही गुन्हे नोंद आहेत. ही कारवाई बीडचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कांवत व अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम, पोलीस उपनिरीक्षक जावेद कराडकर, आमिर इनामदार आणि अनिल मंदे यांच्या पथकाने केली. प्रस्तुत या मोठ्या कारवाईमुळे केज पोलिसांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## खान इनिश्रा रोमनचे शाळेने केले कौतुक



बीड दि १४ (प्रतिनिधी)- रोजी नांदेड येथे ११ जानेवारी रोजी घेतल्या गेलेल्या राज्यस्तरीय थाय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये सेंट झेवियर्स स्कूल, बीड ची विद्यार्थिनी खान इनिश्रा रोमन हिने सुवर्णपदक पटकावल्याबद्दल शाळेचे प्राचार्य प्रिन्सिपल फादर जेम्स थोरात यांनी यांनी कौतुक केले व पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या

यावेळी शाळेच्या समन्वयक भाग्यश्री मॅडम सुषमा सर्दे मॅडम, निजामा मॅडम यांनी चंदा मॅडम, प्रीती हनवते मॅडम यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच तसेच या तसेच या गौरव शाली कामगिरी बद्दल घेतलेल्या अथक मेहनत शाळेचे क्रिडा शिक्षक घोलप सर याचे देखी मुख्याध्यापक फादर जेम्स यांनी या यशा बद्दल अभिनंदन केले.

## विद्युत तारा दुरुस्त करा - सचिन आंधळे



बीड दि १४ (प्रतिनिधी)- तालुक्यातील हिंगणी खुर्द परिसरात विद्युत तारा मोठ्या प्रमाणात जीर्ण झाले असून त्याखाली लोंबकळलेल्या आहेत. या तारांची दुरुस्त करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा चेअरमन सचिन आंधळे यांनी दिला आहे. महावितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे अनेक दुर्घटना घडले आहेत. तुटलेल्या तारा, लोंबकळलेल्या तारा, शॉर्टसर्किट यामुळे अनेकांचे नुकसान झाले आहे, असे असतानाही महावितरण आणि त्यांचे कर्मचारी या दुरुस्तीच्या कामाकडे दुर्लक्ष करत आहेत चेअरमन सचिन आंधळे यांच्या शेतातूनही अशीच विद्युत तार केलेली आहे त्यांच्या ऊसाला तोड येणार असून या तारेमुळे ऊस तोडणी रखडली आहे. हि तार दुरुस्त करून उंचीवर घ्यावी तसेच इतर दुरुस्ती ही करावी यासाठी त्यांनी वारंवार पाठपुरावा करून तोंडी आणि निवेदनही दिले आहेत, तरीही महावितरण लक्ष देण्यास तयार नाही त्यामुळे येणाऱ्या काळात या लोंबकळलेल्या तारा मुळे काही अनुचित प्रकार घडल्यास त्याला जबाबदार महावितरण जबाबदार राहील असे नमूद करून या तारांची त्वरित दुरुस्ती करावी अशी मागणी केली असून दुरुस्ती न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा चेअरमन सचिन आंधळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

## प्रवीणशेठ चोरडिया यांना अखेर पावती मिळालीच-संजय कोठारी



जामखेड दि १४(प्रतिनिधी)- शहरातील प्रवीणशेठ चोरडिया यांची जामखेड नगर परिषदेवर स्विकृत नगरसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल चोरडिया यांचे नाव डिक्लेअर करताच आनंदी वातावरणात त्यांचा नवकार फाउंडेशन मार्फत यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा सौ प्रांजल अमित चिंतामणी, मा. नगरसेवक अमितभाऊ चिंतामणी, उपनगराध्यक्ष पोपटनाना राळेभात, स्वीकृत नगरसेवक पवन राळेभात, स्वीकृत नगरसेवक गणेश डोंगरे यांचा पण सत्कार करण्यात आला यावेळी विनोद बोरा ,प्रशांत बोरा, विनोद बेदमुथ्था, संदीप भंडारी, सुनील चोरडिया, अक्षय चोरडिया प्रफुल्ल सोळंकी , सुरेश बोथरा आणि नगरसेवक आदी उपस्थित होते

## रायमोहच्या वाचनालयात गुरुवर्य किसनराव जाधवांची पुण्यतिथी

रायमोह दि (प्रतिनिधी)- रायमोहमध्ये शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे,पुर्णवेळ अध्यापनासह विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अहोरात्र परिश्रम घेणारे,रायमोहच्या शैक्षणिक क्रांतीचे जनक स्व.गुरुवर्य किसनराव जाधव(अप्पा)यांची ४० वी पुण्यतिथी रायमोहा येथील काही किसनराव जाधव सार्वजनिक वाचनालयात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी शिरुर(का.) पं.स.चे मा.उपसभापती जालिंदर सानप,मा.सभापती राजाभाऊ जाधव,सरपंच सुभाष क्षीरसागर,उपसरपंच सखाराम जाधव,चेअरमन सचिन सांगळे, मा.सरपंच हाशम शेख,लक्ष्मन मंडलिक,मा.उपसरपंच सुरेश जाधव, सुलेमान पठाण,ग्रा.पं.सदस्य सर्वश्री मुराद पठाण,वैजिनाथ जायभाये, जालिंदर (नाथा) मंडलिक, संचालक सर्वश्री अय्युब तांबोळी,सुर्यभान मंडलिक,प्राचार्य इस्माईल तांबोळीसर,निवृत्त मुख्याध्यापक शरद मुंढेसर,तसेच विजयकुमार(बापु)जाधव,भरतभाऊ जाधव,गुलजार पठाण, ग्रंथालय कार्यकर्ते प्रताप आम्ले,राम चव्हाण तसेच ह.भ.प. भास्करबप्पा जाधव, केशवराव राजगुरु(निवृत्त पोस्टमास्तर), मधुकरराव जाधव, शामराव डोळे,संतोष चव्हाण,ग्रंथालयाचे अध्यक्ष सुधाकर जाधव यांनी उपस्थित राहून स्व.अप्पांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन केले .

## मौजे पोखरी (मैदा) येथे आदर्श महाविद्यालय पिंपळनेरच्या रा.से.यो.शिबिराचे उद्घाटन

बीड दि १४(प्रतिनिधी)- रासेयो स्वयंसेवकांनी सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक मूलभूत ज्ञान अंगीकारूण स्वतःचा, कुटुंबाचा, गावाचा मुलभूत विकास साधावा असे विचार प्राथमिक आरोग्य केंद्र ताडसोन्रा अंतर्गत उपकेंद्र पोखरी येथील सीएचओ डॉ. डोईफोडे मॅडम यांनी मांडले.

शाश्वत विकासासाठी युवकांची भूमिका: जलसंधारण व पाणलोट क्षेत्र विकास ही थीम घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर आणि कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे युवक-युवती विशेष शिबिर मौजे पोखरी (मैंदा) येथे पार पडले. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एन.भांडवलकर हे होते. व्यासपीठावर पोखरीचे माजी सरपंच गोरख दन्ने, पोखरीचे मुख्याध्यापक शेख सर, मुख्याध्यापक हांडगे सर, सहशिक्षक घाडगे, जावळे मॅडम, कार्यक्रमाधिकारी डॉ. संजय कांबळे, डॉ.रोहिणी जोशी, डॉ.मदन काळे, आश्रम शाळेचे अधिक्षक ए. यु. आडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ संजय कांबळे, सुत्रसंचलन डॉ.रोहीणी जोशी तर आभार डॉ.मदन काळे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने झाली. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थीनी, स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

# राजमाता जिजाऊ जयंती निमित्त गेवराईत ११० हून अधिक रक्तदात्यांनी केले रक्तदान

गेवराई दि १४ ( प्रतिनिधी)- राजमाता जिजाऊ जयंतीच्या पवित्र पर्वावर गेवराईत आयोजित करण्यात आलेला मानवतेचा महायज्ञात रक्तदान, व्यसनमुक्ती, अवयवदान जनजागृती व अन्नछत्र असे कार्यक्रम राबविण्यात आले असता यामध्ये ११० होऊन अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.गेवराईकर नागरिक, गेवराई व्यापारी महासंघ, गेवराई किराणा व्यापारी संघटना व आसरा फाऊंडेशन, युवा भारत उद्योग समुह , पौळाचीवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने माँ संतोषी पेट्रोल पंप, दत्तराज पार्क समोर, बीड-छत्रपती संभाजीनगर बायपास रोड, गेवराई येथे या महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते.११०+ रक्तदात्यांने रक्तदान केले . सिव्हील हॉस्पिटल बीड येथील ज्योतिबा काळे, तसेच जीवनदायिनी रक्तपेढीचे बालाजी पवार व त्यांच्या टीमच्या सहकार्याने रक्तदान शिबीर यशस्वीपणे पार पडले. सध्या रक्तपेढ्यांमध्ये असलेल्या तीव्र तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम अत्यंत मोलाचा ठरल्याचे आरोग्य विभागाच्या प्रतिनिधींनी नमूद केले.अन्नछत्र : सिंदखेड राजा येथे जाणाऱ्या जिजाऊ भक्तांसाठी नाश्त्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली..

अशा उपक्रमांमुळे संपूर्ण परिसरात सेवा, संस्कार व संवेदनशीलतेचे वातावरण निर्माण झाले.रक्तदात्यांचा सन्मान प्रत्येक रक्तदात्यास गोपी नमकीन (बीड), सुरुची मसाले (नागपूर), विक्रम टी (जालना), अभिजया मसाले (परभणी) व प्रथमेश मसाले (पुणे) , आनंद ट्रेडर्स चोरडीया , सहेली एम्पोरिअम , आदेश



एजन्सी , सुमित लोढा, सोनई एजन्सी (परदेशी) आदी मार्फत रक्तदात्यांना आकर्षक गिफ्ट किट , रिटर्न गिफ्ट म्हणून सप्रेम भेट देण्यात आले. यावेळी मिलिंद कुलकर्णी , मयुर ठाकुर , संतोष भालशंकर , संजय जैन , अशोक मोरे , प्रल्हाद वादे ,रणजीत चव्हाण , प्रविण खरात , बाळु जाधव , मयुर घोडके , प्रतिक कदम , संजय सोनी , प्रकाश सोनी , सचिन सोनी , पंकज जैन , किशोर चितले ,भाऊसाहेब गोंजारे , अशोक टकले , गणेश जाधव , युवराज पवार , अभिजीत कुडे , गणेश गरुड , विशाल तळेकर , रणजीत जाधव , महादेव बेदरे , संजय भालशंकर , केदार मिटकर , नितीन बोबडे , भागवत वारुळे , अजय भुतडा , अमोल गंगवाल , आनंद शेंबडे ,डॉ विशाल काकडे , ज्ञानेश्वर महाजन , प्रमोद टाकळकर , रामेश्वर बुलबुले , सुनिल सोनी , पंकज पुजदेकर , भागवत जाधव , पंकज सेगल , यशराज पंडीत , गणेश सुतारे , दिपक घाडगे , भाऊसाहेब बोरडे , योगेश कापसे , अशोक सिकची , सुनिल हराडे , अविनाश मालवदे , पवन शिवलिंग , शिवम बरगे , अशोक मोटे , सुरेश बरगे , सोनवणे कल्याण , श्रुती शिवाजी कुटे , राजगोपाल सोनी , अंकुश तेलुरे , रामेश्वर जगताप , प्रताप खरात , धनंजय नाइकवरे , वेदात गोरे , दिप चव्हाण , निखील काला , चंद्रकात घोलप , गणेश कुलकर्णी , राठोड अविनाश , गजानन राजपूत , रजंन देशमुख , शरद पवार , योगेश जाजू , सतिश बाराखडे , अमोल नाईक , अमोल गुमरे , गणेश जैस्वाल , पटेल हरेशकुमार , तरकड धिरज , सुरेन्द्र रुकर , चंदु कदम , भाऊसाहेब बेद्रे , मधकर शुभम , सावंत अमर यांनी गेवराई येथे तर ज्ञानेश्वर नवले , गणेश आहेर , अमोल आहेर , सिंधु पौळ ,अशोक पौळ , सिद्धू घारगे , धर्मा पौळ , मुकुंद आहेर , भारत साळुंके ,संजय साळुंके , तात्या पौळ , कृष्णा पौळ , आकाश शेंडगे , शरद जाधव , भागवत शेडगे , माऊली जाधव , सुनिल पौळ , नंदु जाधव , गणेश शेंडगे , शांतीलाल फौजी गिरी , गोरख जाधव यांनी पौळाचीवाडी येथे रक्तदान केले .

# सेवाभाव, शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाची ओळख : प्राजक्ता काकू धस



आमदार सुरेश आण्णा धस यांच्या प्रत्येक समाजकार्यामागे उभी असलेली खंबीर साथ, मायेची सावली आणि निःस्वार्थ प्रेरणाशक्ती

महानंदाच्या संचालिका तसेच आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या सुविद्य पत्नी आदरणीय सौ. प्राजक्ता काकू सुरेश आण्णा धस यांचा वाढदिवस मकर संक्रांतीच्या पावन आणि मंगल पर्वावर साजरा होणे, हे त्यांच्या जीवनकार्याशी सुसंगत असेच म्हणावे लागेल. परिवर्तन, सकारात्मक ऊर्जा आणि नवचैतन्याचे प्रतीक असलेल्या मकर संक्रांतीप्रमाणेच प्राजक्ता काकूंचे कार्यही समाजाला नवी दिशा देणारे ठरत आहे.

सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी क्षेत्रात प्राजक्ता काकूंनी केलेले कार्य हे केवळ औपचारिक नसून, त्यामागे प्रामाणिक तळमळ आणि संवेदनशील मन आहे. शिक्षण क्षेत्रात त्यांच्या माध्यमातून सुरू असलेली कामे ही समाजाच्या मुळावर सकारात्मक परिणाम घडवणारी आहेत. विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी मिळाव्यात, गुणवत्तेला वाव मिळावा आणि शिक्षणाच्या जोरावर सक्षम पिढी घडावी, या हेतूने त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. महिला सक्षमीकरणासाठी राबवलेले विविध उपक्रम, गरजू घटकांसाठी मदतीस तत्काळ धावून जाण्याची तयारी, तसेच सामाजिक कार्यक्रमांमध्ये स्वतःहून सहभागी होऊन जबाबदारी उचलण्याची त्यांची भूमिका समाजात आदर्श ठरत आहे. धार्मिक आणि अध्यात्मिक कार्यातही श्रद्धा, संयम आणि सातत्य ठेवून सहभाग नोंदवणे, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील समतोल आणि संस्कारांची प्रचिती देणारे आहे. आमदार सुरेश आण्णा धस यांच्या प्रत्येक सामाजिक आणि जनहिताच्या कार्यामागे प्राजक्ता काकूंची खंबीर साथ ही एक मजबूत आधारस्तंभ आहे. केवळ सोबत चालणारी नाही, तर योग्य वेळी मार्गदर्शन करणारी, आत्मविश्वास देणारी आणि सावलीसारखी उभी राहणारी त्यांची भूमिका उल्लेखनीय आहे. यशाच्या प्रत्येक टप्प्यावर पडद्यामागे राहून दिलेली साथ हीच त्यांच्या निःस्वार्थ नेतृत्वाची खरी ओळख आहे.उत्तम व्यवस्थापन कौशल्य, स्पष्ट व निर्भीड विचार मांडण्याची शैली, आणि सर्वांशी आईप्रमाणे आपुलकीने वागण्याचा स्वभाव यामुळे प्राजक्ता काकूंनी समाजमनात विशेष स्थान निर्माण केले आहे. कुटुंबवत्सलतेचा आदर्श जपत समाजहिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या प्राजक्ता काकू आज अनेक महिलांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरत आहेत.आदरणीय प्राजक्ता काकूंना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, यश, आनंद लाभो, तसेच त्यांचे सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी कार्य अधिक व्यापक स्वरूपात विस्तारत राहो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांच्या कार्यातून समाजात सकारात्मक परिवर्तनाची ज्योत अशीच अखंड प्रज्वलित राहो, हीच आई जगदंबेच्या चरणी प्रार्थना.....

■■■

शब्दांकन
**ॲड.महेश बेदरे** पत्रकार

# समाज परिवर्तनाचा खंबीर आधार



## वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा,आ.दादासाहेब!

खरं तर दादासाहेबांच्या कार्याबद्दल लिहिताना शब्द अपुरे पडतात. कितीही लिहिले तरी ते कमीच वाटते, कारण दादासाहेबांचे कार्य केवळ व्यक्तीपुरते मर्यादित नसून संपूर्ण तालुक्याच्या सामाजिक जीवनाशी जोडलेले आहे.

तालुक्यातील शेतकरी, महिला, सामान्य जनता, सुशिक्षित नोकरदार किंवा गोरगरीब नागरिक असोत–कुठलीही सरकारी योजना असो–प्रत्येकाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व म्हणजे आदरणीय दादासाहेब. संकटाच्या वेळी आधार देणे, अडचणीत असताना मदतीचा हात पुढे करणे आणि प्रत्येकाला आपुलकीने सामावून घेणे, हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे.

महिला सक्षमीकरणाच्या कार्यात दादासाहेब–. आदरणीय वहिनी यांची भूमिका समाजासाठी प्रेरणादायी ठरली आहे. वहिनींच्या प्रत्येक सामाजिक उपक्रमामागे दादासाहेबांचा विश्वास, पाठिंबा आणि बळ ठामपणे उभे असते. महिला बचत गट, शैक्षणिक उपक्रम तसेच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून अनेक महिलांना सक्षम करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. महिलांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले, तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडते, हे दादासाहेबांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे.

दादासाहेबांनी केवळ मार्गदर्शनच केले नाही, तर अनेक युवक व महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. विविध प्रशिक्षण उपक्रम, बचत गट व स्वयंरोजगाराच्या माध्यमातून अनेक कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळाले आहे. समाजाच्या उन्नतीसाठी रोजगारनिर्मिती हे महत्त्वाचे साधन असल्याची जाणीव त्यांच्या कार्यातून सातत्याने दिसून येते.

जोतिबा फुले यांच्या विचारांची ज्योत जपणारे दादासाहेब, मिळालेल्या संस्कारांचे बाळकडू समाजासाठी उपयोगात आणतात. स्वतःच्या आयुष्यात प्रसिद्धीचा प्रभाव न आणता, तो प्रभाव इतरांच्या आयुष्यात प्रकाश बनून पोहोचावा, हीच त्यांची खरी श्रीमंती आहे.

मला नेहमी वाटते–जानेवारी महिन्यात जन्मलेली माणसे ही समाजासाठी कार्य करण्यासाठीच जन्मलेली असतात. याच महिन्यात "एक तीळ सात जणांनी वाटून खाण्याची" शिकवण आहे–एकोप्याची, वाटचालीची आणि माणुसकीची. त्या विचारांचे मूर्त स्वरूप म्हणजे आदरणीय दादासाहेब. स्वतःला पूर्णपणे समाजकार्यासाठी वाहून घेणाऱ्या व्यक्तींमध्ये दादासाहेबांचे नाव अभिमानाने घेतले जाते.

दादासाहेब, तुमचे कार्य आज समाजाच्या तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचले आहे. पुढील काळातही हे कार्य अधिक व्यापक व्हावे, यासाठी तुम्हाला उत्तम आरोग्य, दीर्घ आयुष्य आणि अपार बळ लाभो, हीच मनःपूर्वक सदिच्छा!

पुन्हा एकदा वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा....!

**ज्योती जोशी**
मराठी विभाग प्रमुख
सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव

# यूपीएससी यशासाठी शिस्त, सातत्य आणि ध्येय स्पष्ट असणे आवश्यक–पोलीस अधीक्षक नवनीत काँवत

## जय भवानी महाविद्यालयात करिअर कट्टाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर




पाटोदा (प्रतिनिधी) : करिअर कट्टा आणि जय भवानी महाविद्यालय, पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दिनांक १३ जानेवारी रोजी पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयाच्या सभागृहात यूपीएससी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भव्य मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या मार्गदर्शन शिबिरासाठी बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, "यूपीएससी ही केवळ एक परीक्षा नसून ती प्रशासकीय जबाबदारीसाठी आवश्यक असलेले व्यक्तिमत्त्व घडवणारी दीर्घकालीन साधना आहे. या परीक्षेत यश मिळवण्यासाठी सुरुवातीपासून योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मशिस्त अत्यंत आवश्यक आहे."

यावेळी त्यांनी यूपीएससी परीक्षेचे तीन टप्पे – पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत यांची सविस्तर माहिती दिली. पूर्व परीक्षेसाठी मूलभूत संकल्पनांचा अभ्यास, एनसीईआरटी पुस्तकांचे महत्त्व, चालू घडामोडींचे नियमित वाचन, तसेच मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा अभ्यास कसा करावा, याबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

मुख्य परीक्षेबाबत बोलताना त्यांनी उत्तर लेखन कौशल्य विकसित करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. उत्तर लिहिताना मुद्देसूद मांडणी, विश्लेषणात्मक दृष्टिकोन, वेळेचे व्यवस्थापन आणि आकडेवारी व उदाहरणांचा योग्य वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिक स्वरूपात मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. तसेच मुलाखतीच्या टप्प्यात आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, सकारात्मक दृष्टिकोन, संवाद कौशल्य आणि नैतिक मूल्ये हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमादरम्यान पाटोद्याचे भूमिपुत्र तसेच छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयातील विधिज्ञ ॲड. तात्यासाहेब घुमरे यांनीदेखील आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना त्यांनी या मार्गदर्शन शिबिराच्या आयोजनामागील हेतू स्पष्ट करत सांगितले की, "ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची कमतरता नाही, मात्र योग्य दिशा व मार्गदर्शनाअभावी अनेक विद्यार्थी मागे पडतात. पाटोदा व परिसरातील विद्यार्थ्यांना यूपीएससीसारख्या प्रतिष्ठित परीक्षेची तयारी करण्यासाठी योग्य प्रेरणा, माहिती व आत्मविश्वास मिळावा, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे." कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारीवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच सर्व मान्यवरांचे मनापासून स्वागत केले. या मार्गदर्शन शिबिरास यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तराच्या सत्रात आपल्या अभ्यासातील अडचणी मांडल्या, ज्यावर पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी समर्पक उत्तरे देत योग्य दिशा दाखवली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांनी अशा प्रकारचे मार्गदर्शन शिबिर नियमितपणे आयोजित करण्याची मागणी केली.

# सावरकर महाविद्यालयाच्या शिबीरात ॲड.सारिका कुलकर्णींचे मार्गदर्शन




बीड (प्रतिनिधी) : दि.१० जानेवारी २०२६ रोजी पहिल्या सत्रात सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मौजे आदर्श गाव वंजारवाडी येथे सात दिवसीय निवासी युवक युवती श्रमसंस्कार शिबिरात बालविवाह प्रतिबंधक कायदे विषयी मार्गदर्शन सत्र संपन्न झाले. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्त्या जिल्हा सत्र न्यायालय बीड येथील प्रसिद्ध विधीतज्ञ अँड. सारिका कुलकर्णी जोशी होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना बालविवाह म्हणजे काय? बालविवाहासाठी मुलींचे व मुलांचे वय किती असते? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे देत बालविवाह किती बेकायदेशीर आणि गुन्हा आहे या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. बालविवाहाचे प्रमाण पूर्वी एवढे जरी नसले तरी थोडे आहेच आणि ते आपल्या महाराष्ट्रात किती आहे व इतर राज्य बिहार, उत्तर प्रदेश मध्ये अधिक असल्याचे नमूद केले. बालविवाह अगदी लहान वयात होत असल्यामुळे मुलाच्या व मुलीच्या आरोग्यावर परिणाम करणारा, मानसिकतेवर परिणाम करणारा व त्यांच्या संपूर्ण जीवनावर परिणाम करणारा ठरतो. बालविवाहामुळे कुपोषण, बालकांचा जन्म मृत्युदर, कुटुंबातील मुलींचे शिक्षण थांबणे, मुलींचे शारीरिक स्वास्थ्य बिघडणे, कौटुंबिक छळ व त्याचेच रूपांतर नंतर घटस्फोटापर्यंत पोहोचते, याविषयीची अधिक माहिती दिली. बालविवाह करणे कसा गुन्हा आहे व बालविवाह केल्यास तुरुंगवासाची शिक्षा असल्याचे स्पष्ट केले. तसेच बालविवाहास उपस्थित राहणारे, पाहुणे, भटजी, वाजंत्री वाले, मित्र, कुटुंब, नातेवाईक, फोटोग्राफर असे सर्वांवरच गुन्हा दाखल होतो याची सुध्दा सविस्तर माहिती दिली. जर बालविवाह आपल्या गावामध्ये किंवा परिसरात कुठेही होत आहे असे कळाल्यास कोणत्याही व्यक्तीने १०९८ या नंबरवर फोन करून माहिती द्यावी असे आव्हान केले. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवले जाते असेही म्हणाल्या. शेवटी आपल्या भाषणात नंतर बालविवाह प्रतिबंधक कायद्याची तरतूद सांगून त्यांनी उपस्थितांना बालविवाह प्रतिबंधाची सामूहिक शपथ दिली. या सत्राच्या अध्यक्षा प्रो. डॉ. रूपाली कुलकर्णी मॅडम यांनी अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनातील प्रशिक्षण भविष्यात कसे उपयुक्त आहे हेसांगितले. बाल विवाह प्रतिबंध कायद्याचे ज्ञान असणाऱ्यांनी सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी सर्व लोकापर्यंत बालविवाह प्रतिबंध कायद्याची माहिती पोचवावी अशी अपेक्षा व्यक्त केली. समाजात बालविवाह प्रथा काही जाती वर्गामध्ये अजूनही चालू असल्याची खंत व्यक्त केली. तसेच सर्व विद्यार्थ्यांना आव्हान केले की बालविवाह विषयी माहिती झाल्यास तात्काळ त्यांना समजून सांगणे व बालविवाहास विरोध करण्यास पुढे येण्याचे आव्हान केले. या कार्यक्रमाला अँड. निलेश जोशी यांचीही विशेष उपस्थिती होती. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. राजपाल जाधव, प्रा. राम गव्हाणे, दिन प्रमुख डॉ. जे. के. भालेराव तसेच सर्व शिबिरातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी हजर होते.

# माध्यमिक विद्यालय रुई शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

गेवराई (प्रतिनिधी) : प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट बीड द्वारासंचलित माध्यमिक विद्यालय रुई तालुका गेवराई या शाळेची शैक्षणिक सहल ६ जानेवारी ते १० जानेवारी २०२६ मुंबई गेटवे ऑफ इंडिया, नेहरू तारांगण, नेहरू सायन्स म्युझियम, सिद्धिविनायक गणपती मंदिर मुंबई, मुंबई दर्शन, अलिबाग बीच, कुलाबा किल्ला, जंजिरा किल्ला, श्रीवर्धन बीच, हरिहरेश्वर मंदिर, रायगड किल्ला, प्रतापगड, महाबळेश्वर इत्यादी स्थळांना भेटी देऊन ऐतिहासिक व धार्मिक भौगोलिक माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी सहलीचा आनंद लुटला या सहलीमध्ये मुले ३० व मुली ५४ अशी एकूण ८४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या सहलीमध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे एस जी, सहल प्रमुख ज्येष्ठ शिक्षक श्री पठाण यम यु, जोगदंड आर यु, श्री सातपुते बीएच, श्री खांडे एस. एन, श्री भोपळे एस बी, श्री गायकवाड पी के, महिला शिक्षिका सोनार छाया बबन यांनी सहभाग घेतला. अशा रीतीने सहल आनंदात व्यवस्थित पार पडली.

## जाहीर प्रगटनास उत्तर

दि.१७/१०/२०२५ रोजी, दै. कार्यारंभ या दैनिकात, १. श्री. शंकर यादवराव तांदळे, २. श्री. तुकाराम किसनराव शिंदे, दोघे रा. चऱ्हाटा, ता. जि. बीड आणि ३. मनिषा विष्णु मिसाळ, रा. खोकरमोह, ता. शिरूर (का.), जि. बीड यांनी प्रसिद्ध केलेल्या जाहीर प्रगटनाबाबत, श्री. महेश श्रीपती भोसले, रा. करंडे मौर्य हाऊसींग सोसायटी, सुदर्शन नगर रोड, चिखली, ता. हवेली, जि.पुणे, ह.मु.हळ्ळी (खुर्द), ता. चाकूर, जि. लातूर खालील प्रमाणे खुलासा करत आहेत.

सदर दैनिकामधे प्रसिद्ध केलेल्या जाहीर प्रगटनामधील मजकुर हा चुकीचा व दिशाभुल करणारा आहे. जाहीर प्रगटन देणार यांनी स्वतःचे हित साध्य करणेच्या दुष्ट हेतूने, सत्य परिस्थिती लपवुन ठेवून खोट्या आशयाचे जाहीर प्रगटन दिले आहे, जे चुक आहे.

सत्य परिस्थिती अशी की, जाहीर प्रगटनाचे उत्तर देणार श्री. महेश श्रीपती भोसले यांनी, मौजे तळेगाव, ता. जि. बीड येथील गट क्र. १६२ पैकी ०० हे.६० आर जमीन, जिच्या चतुः सिमा :–

**पुर्वेस :** अंतर्गत रस्ता व श्री. विष्णू मारूती मिसाळ यांची जमीन, **पश्चिमेस :** श्री.रामकिसन ढोरमारे यांची जमीन, **दक्षिणेस :** बीड–नगर राज्य मार्ग, **उत्तरेस :** श्री.लक्ष्मण नामदेव व इतरांची जमीन

येणे प्रमाणे चतुः सिमेमधील मिळकत, श्री. शंकरलाल पि. राजाराम उर्फ छन्नुलाल मस्के, रा.घर क्र.४६३/२५८७. संत तुकाराम नगर, पिंपरी, ता. हवेली, जि. पुणे यांचेकडून खरेदीखत अ.क्र. १७१७/२०१४ दि.३०–०७–२०१४ रोजी, बाजारभावाने मावेजा अदा करून खरेदी केलेली आहे. श्री. शंकरलाल मस्के हे जमीनीचे मुळ मालक आहेत. खरेदी तारखेपासून जाहीर प्रगटनाचे उत्तर देणार श्री. महेश श्रीपती भोसले हे सदर मिळकतीवर मालक नात्याने कब्जेदार आहेत. महसुल अभिलेखात फेर क्र.४६०२ नुसार खरेदीखताआधारे श्री. महेश भोसले यांचे नावे खरेदी क्षेत्र नोंदविले आहे. गट नं. १६२, मौजे तळेगाव, ता. जि.बीड चे ७/१२ आणि ८–अ उताऱ्यामधेही श्री. महेश श्रीपती भोसले यांनी खरेदी केलेल्या क्षेत्रफळाची नोंद मालक व कब्जेदार म्हणून केली आहे. सदर नोंदी वैध असून त्याबाबत कोणीही आक्षेप घेतलेला नाही. सदर नोंदी आजतागायत कायम आहेत.

जाहीर प्रगटन देणार श्री. शंकर तांदळे, श्री. तुकाराम शिंदे आणि मनिषा मिसाळ यांनी सदर गटात खरेदी केलेले क्षेत्र आणि जाहीर प्रगटनाचे उत्तर देणार श्री. महेश भोसले यांनी खरेदी केलेले क्षेत्र वेगवेगळे आहे. श्री. महेश भोसले यांनी खरेदी केलेल्या क्षेत्रफळाशी, जाहीर प्रगटन देणार यांचा कसलाही दुरान्वयाने संबंध नाही. तथापी, त्याने खरेदी केलेली मिळकत गिळंकृत करणेच्या दुष्ट हेतूने, खरी वस्तुस्थिती लपवुन ठेवून, खोडसाळपणाने जाहीर प्रगटन दिले आहे. जाहीर प्रगटनामधील कथन जे की, गट नं. १६२ चे मुळ मालक श्री. शंकरलाल मस्के यांनी सदर गटातील क्षेत्र वेगवेगळ्या लोकांना विक्री केल्याने व कांही क्षेत्र रस्त्यामधे समाविष्ट असल्याने, सदर गटात मुळ मालक श्री. शंकरलाल मस्के यांचे मालकी व कब्जेचे क्षेत्र शिल्लक नव्हते, हे म्हणणे पुर्णतः चुकीचे व मोघम स्वरूपाचे आहे. त्यास कोणताही आधार नाही. श्री. शंकरलाल मस्के यांनी किती क्षेत्र विक्री केले, रस्त्यामधे किती क्षेत्र समाविष्ट झाले, या बाबत कोणताही तपशील जाहीर प्रगटनामधे दिलेला नाही. केवळ दिशाभुल करून स्वतःचा हेतु साध्य करणेच्या हेतूने जाहीर प्रगटन दिले आहे.

जाहीर प्रगटन देणार श्री. शंकर तांदळे व इतर दोघांनी, बीड येथील न्यायालयामध नि.दि.दा.क्र.६०९/२०१४ हा गट नं. १६२ मधील त्यांनी खरेदी केलेल्या ०० हे.५४ आर क्षेत्रफळा बाबत, श्री. महेश भोसले व इतर दोघांचे विरूद्ध दाखल केला आहे. सदर दावा हा निरंतर मनाई हुकूमाचा आहे. जाहीर प्रगटनाचे उत्तर देणार श्री. महेश भोसले यांनी खरेदी केलेल्या मिळकतीशी त्यांचा कसलाही संबंध नाही. दोन्ही मिळकतीच्या चतुः सिमा वेगवेगळ्या आहेत. गट नं. १६८ मधील, श्री. महेश भोसले यांनी खरेदी केलेले ०० हे.६० आर क्षेत्र, त्यांचे निर्विवाद मालकी व कब्जेचे आहे. खरेदीखतापासून आजतागायत सदर क्षेत्रावर त्यांची कब्जे वहिवाट आहे. सदर मिळकत त्यांना विक्री, दान, गहाण, साठेखत, बक्षीसपत्र, इ. स्वरूपाने हस्तांतरीत करणेचा पूर्ण अधिकार आहे. श्री. महेश भोसले यांनी खरेदी केलेल्या मिळकती संदर्भात, मे. दिवाणी न्यायालय अथवा ईतर कोणत्याही तत्सम न्यायलायाने मनाई आदेश पारीत केलेला नाही. सदर मिळकत बीड शहराजवळ असल्याने, तिचे बाजारीमुल्य वाढले आहे. त्यामुळे सदर मिळकतीवर जाहीर प्रगटन देणार यांचा डोळा आहे. त्यामुळे चुकीचे जाहीर प्रगटन देऊन लोकांची दिशाभुल करून, स्वतःचा दुष्ट हेतू साध्य करणेचा प्रयत्न करत आहेत.

सबब है जाहीर प्रगटनास उत्तर दिले आहे.

जाहिर प्रगटनास उत्तर देणार
**महेश श्रीपती भोसले**

बीड
दिनांक : १४/०१/२०२६

12973 / PP

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस जाहिर विशेषतः खामगांव ता. गेवराई जि. परिसरातील जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, जाहिर प्रगटन देणार आमचे पक्षकार नामे कल्याण पि. विठोबा गुंड, रा. खामगांव ता. गेवराई जि.बीड व इतर तीन यांचे ताब्यातील व नसीबा बेगम यासीन बेग, यासीन गुलजार बेग व चंद्रकात उत्तम काकडे यांचे नावे असलेली मिळकत जिचे वर्णन खालील प्रमाणे

मौजे खामगांव ता. गेवराई जि. बीड येथील गट नं.२३ एकुण क्षेत्र ०४हे.०४ आर पैकी ०२ हे.०२ आर जमीन जिची चतुः सिमा पुर्वेस–चंद्रकांत उर्फ मुंगा काकडे, पश्चिमेस–खामगांव सावरगांव शिव, दक्षिणेस–कल्याण गुंड यांची जमीन व उत्तरेस– रस्ता

वरील गट नं. २३ मधील ०४हे.०४ आर पैकी ०२ हे.०२ आर हि जमीन नसीबा बेग बेगम व यासीन गुलजार बेग यांचे नावे चुकीने ७/१२ पत्रकी नोंदवलेली आहे. त्याचा गैरफायदा घेऊन नसीबा बेग बेगम व यासीन गुलजार बेग हे सदरची ०२हे०२ आर जमीन विक्री करण्याचे प्रयत्नात आहेत. वास्तविक सदर मिळकतीशी त्यांचा कसल्याही प्रकारचा संबंध नाही किंवा सदर जमीनीवर त्यांचा ताबा देखील नाही.

नसीबा बेग बेगम व यासीन गुलजार बेग हे सदर ०२हे०२ आर जमीन चंद्रकांत उर्फ मुंगा उत्तम काकडे यांचे सहकार्याने विक्री करण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे आमचे पक्षकार कल्याण पि.विठोबा गुंड व त्यांच्या बहिणी नामे आशाबाई किसन खरात, सुलाबाई मधुकर जाधव, यमुनाबाई अर्जुन डंगरे यांनी वरील लोकांविरुध्द मा. दिवाणी न्यायाधीश साहेब व. स्तर बीड यांचे न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. ५५४/२०२५ मालकी हक्क जाहिर करणे व मनाई हुकूम मिळणे बाबतचा दावा दाखल केलेला असुन तो प्रलंबीत आहे.

आशा परिस्थितीत वरील उपरोक्त मिळकत नसीबा बेग बेगम व यासीन गुलजार बेग हे विक्री करण्याचे प्रयत्नात आहेत. तसेच सदर मिळकतीवर बळजबरीने ताबा करण्याचे प्रयत्नात आहेत.

त्यामुळे या जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, नसीबा बेग बेगम व यासीन गुलजार बेग यांचे बरोबर उपरोक्त मिळकतीबाबत खरेदी, विक्री किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये, जर तसा व्यवहार झाला तर सदरचा व्यवहार आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.
ठिकाण : बीड
दिनांक १४/०१/२०२६

जाहिर प्रगटन देणार
**कल्याण पि. विठोबा गुंड**
खामगांव ता. गेवराई जि.बीड

मार्फत – **ॲड.आर.बी. हसेगावकर**
बीड, मो.नं. ७२७६६८१६३१

16493/ 14381

## जाहिर प्रगटन

तमाम जनतेस कळविण्यात तथा जाहिर करण्यात येते की, आमचे पक्षकार **अशोक अंबादास जोगदंड**, रा. येवता ता. केज.जि.बीड यांनी **१) अकाश अशिषकुकुमार जैन, २) अतिन हेमचंद्र डोणगांवकर ३) अनिल सुभाषचंद्र काला ४) बाबु आश्रुबा बंगाळ** सर्व रा.बीड ता.जि.बीड यांच्या मालकी व ताब्यातील

र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.व ता.बीड पैकी मौजे व ग्रामपंचायत धनगरवाडी ता.जि.बीड येथील गट नं. १०६ मधील त्यांचे मालकी व ताब्यातील लेआऊट मधील श्री. स्वामी समर्थ पार्क मधील प्लॉट क्र. १२ ज्याचे क्षेत्रफळ पुर्व पश्चिम १४.२० चौ.मी. व दक्षिणोत्तर ८.२० चौ.मी. ज्याचे एकुण क्षेत्रफळ १२५३ चौ. फुट म्हणजेच ११६.४४ चौ.मी. ज्याची चतुः सिमा पुर्वेस–प्लॉट क्र. १३, पश्चिमेस –प्लॉट क्र. ११, दक्षिणेस ०९ मिटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस–प्लॉट क्र.२ अशी आहे.

उपरोक्त चतुःसिमे अंतर्गत येणारा प्लॉट आमचे पक्षकाराने खरेदी करण्याचा करार केलेला आहे. सदर खरेदी व्यवहार पूर्ण करण्याचे कामी कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण न झाल्यास आमचे पक्षकार सदरची मिळकत कायमस्वरुपी खरेदी करणार आहेत. सदरील मिळकतीचा वाद न्यायालयात अथवा इतरत्र नसल्याबाबतची खात्री विद्यमान मिळकत मालकांनी दिलेली आहे.

तरी वरील मिळकतीबद्दल कोणलाही खरेदी, गहाण, बक्षीस, मृत्युपत्र, अदलाबदल व इतर प्रकारचा आर्थिक स्वरुपाचा बोजा, वहिवाटी, कोर्ट डिक्री आधारे इत्यादी कोणत्याही प्रकारचे (स्थावर मिळकती संबंधी) कोणतेही हक्क अथवा अधिकार सांगावयाचे असल्यास त्याची लेखी नोंद संबंधीत कागदपत्राच्या झेरॉक्स प्रतीसह हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसाचे आत लेखी स्वरुपात करावी व त्याची पोहच घेऊन जावी नसता वरील मिळकतीबद्दल कोणलाही कोणत्याही प्रकारचे अधिकार हक्क सांगावयाचा नाही, असे समजुन माझ्या पक्षकारास व्यवहार करण्यास आक्षेप नाही असे समजुन व्यवहार पूर्ण करण्यात येईल आणि त्यानंतर कोणाचाही अधिकार असणार नाही, याची नोंद सर्वांनी घ्यावी.

करीता जाहिर प्रगटन.
ठिकाण : बीड
दिनांक : १४/०१/२०२६

जाहिर प्रगटन देणार
**अशोक अंबादास जोगदंड**
रा. येवता ता. केज.जि.बीड
मो.नं.९९७५२२८८५४

मार्फतः **(सुहास एस. महाजन)**
ॲडव्होकेट, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
मो.नं.९५११२१५५६५

16494/13428

## जाहिर प्रगटन

**माजलगांव येथील श्री.जी.एस.खूपसे,२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, माजलगांव जि. बीड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३८/२०२६
रुक्मीणबाई व इतर वि.निरंक (मार्फत विधिज्ञ : बी.आर.डक)

अर्जदार : **१. श्रीमती रुक्मीणबाई भ्र. विठठलराव बोराडे**, वय ६५ वर्षे, धंदा–घरकाम, रा. फुले नगर, माजलगाव, ता. माजलगाव जि.बीड
**२.प्रविण पि. विठठलराव बोराडे**, वय ४९ वर्षे, धंदा–घरकाम, रा. फुले नगर, माजलगाव, ता. माजलगाव जि.बीड

विरुध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे **विठठलराव कोंडीबा बोराडे**, हे/या दि.०८/११/२०२५ रोजी देशपांडे हॉस्पीटल, माजलगाव, ता. माजलगाव जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आणी त्यांचे वरीलप्रमाणे अर्जदार क्र.१ व २ यांनी कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज केला आहे.

अर्जदार/गैरअर्जदारा शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार/गैरअर्जदारा असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार / गैरअर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: १३/०१/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीखः २६/०२/२०२६

आदेशावरुन
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर,माजलगाव

# पवनचक्की कंपन्यांना पाठीशी घालणाऱ्या प्रशासनाच्या निषेधार्थ निदर्शने संपन्न

बीड दि १४ (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील बीड, पाटोदा व केज तालुक्यांमध्ये कार्यरत पवनचक्की कंपन्यांकडून गोरगरीब व अडाणी शेतकऱ्यांवर होत असलेली दहशतगिरी, आर्थिक लूट आणि मानसिक छळ असह्य झाल्याने अखेर शेतकरीपुत्र रस्त्यावर उतरले. पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारा विरोधात तसेच त्यांना उघडपणे पाठीशी घालणाऱ्या जिल्हा प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात दि. १४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते डॉ गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जोरदार निदर्शने करण्यात आली. पान २ वर




# राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये संविधानाची भूमिका महत्त्वाची-रवींद्र जोगदंड

## स्वा.सावरकर महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार दिन

बीड(प्रतिनिधी) :- देशाच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये भारतीय संविधानाची भूमिका महत्वाची आहे असे प्रतिपादन रवींद्र जोगदंड, मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी प्रोजेक्ट छत्रपती संभाजीनगर यांनी केले.येथील स्वा.सावरकर महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा चा नामविस्तार दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



संस्थेचे कोषाध्यक्ष सत्यनारायण लोहिया, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे,उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, डॉ सोपान सुरवसे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना रवींद्र जोगदंड म्हणाले डॉ. बाबासाहेब बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ज्ञान आणि संशोधनाचा उपयोग राष्ट्र उभारणीसाठी केला. न्याय, समता, बंधुत्व ही तत्वे पान २ वर

### नगरपरिषदेस व्यापाऱ्यांचा इशारा

# स्वच्छता न झाल्यास रविवारी पालिकेसमोर भरविणार बाजार

बीड दि.१४(प्रतिनिधी):- बीड नगरपरिषद हद्दीतील आठवडी बाजार, भाजी मंडई आणि इतर व्यावसायिक भागातील घाणीच्या प्रश्नाने व्यापारी वर्ग संतापला आहे. मोमीनपूरा मुख्य रस्ता, नवीन भाजी गंडई, राजीवगांधी चौक, नगर नाका मच्छी मार्केट आणि पालवन चौक या भागात स्वच्छता न होण्यामुळे व्यापाऱ्यांना घाणीवर बसून व्यवसाय करावा लागत आहे. या घाणीमुळे दुर्गंधी, रोगराईचा धोका आणि भाजी-पाला, फळांवर जंतूंचा प्रादुर्भाव होत असल्याने ग्राहकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे. नगरपरिषदेकडून ठेकेदार मार्फत १० व २० रुपये कर आकारला जात असूनही स्वच्छता होत नसल्याचा आरोप करत व्यापाऱ्यांनी इशारा दिला आहे की, स्वच्छता केली नाही तर येणाऱ्या रविवारी नगरपरिषद कार्यालयासमोरच आठवडी बाजार भरविणार!बीड शहरातील दैनंदिन आणि आठवडी बाजारातील व्यापारी संघटनेने नगरपरिषदेला सादर केलेल्या विनंती अर्जात या सर्व समस्या कागदोपत्री नोंदवल्या आहेत. मोमीनपूरा, पालवन चौक, नवीन भाजी मंडई आदी भागात नगरपरिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून योग्य स्वच्छता होत नसल्याचे व्यापाऱ्यांनी नमूद केले आहे. आम्ही दररोज कर भरतो, पण घाणीवर बसून व्यापार करावा लागतो. दुर्गंधीमुळे रोगांचा धोका वाढला आहे आणि भाजी-पाला दूषित होत आहेत, असा संताप व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. दर रविवारी सकाळी आठवडी बाजार परिसर पूर्णपणे स्वच्छ करावा, मोकाट जनावरे कोंडवाड्यात टाकावीत आणि भाजी मार्केटमध्ये पान २ वर

# पाटोदा शहराच्या विकासासाठी प्लानटेरा कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नगरपंचायतीस भेट




पाटोदा दि.१४(प्रतिनिधी):- आ.सुरेश धस तसेच महानंदाच्या संचालिका प्राजक्ता धस यांच्या सूचनेनुसार प्लानटेरा कंपनीचे वरिष्ठ अधिकारी अमित पोखरणा आणि विजयकुमार सोले यांनी बुधवार, दिनांक १४ जानेवारी रोजी पाटोदा नगरपंचायत कार्यालयास भेट दिली. शहराच्या सर्वांगीण विकासाचा बारकाईने आराखडा तयार करणारी प्लानटेरा कंपनी पाटोदा शहरातील विविध ठिकाणच्या विकासात्मक सुशोभीकरणासह इतर प्रस्तावित कामांची पाहणी व आढावा घेण्यासाठी ही भेट देण्यात आली. या वेळी अधिकाऱ्यांनी शहरातील नमो उद्यान, राष्ट्रसंत भगवान बाबा चौक यांचा नियोजित विकास आराखडा तसेच सौरऊर्जेवर आधारित भविष्यात राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांबाबत प्राथमिक माहिती घेतली. पान २ वर

# ज्येष्ठ पत्रकार रईस खान यांना राज्यस्तरीय आफताब-ए-सहाफत पुरस्कार जाहीर



बीड दि.१४(प्रतिनिधी):- गेल्या २५ वर्षांपासून हिंदी, उर्दू व मराठी पत्रकारितेत प्रामाणिकपणे व जबाबदारीने कार्यरत असलेले बीडचे प्रसिद्ध पत्रकार रईस खान सिकंदर खान यांची 'खादिमीन-ए-उम्मत' संस्थेच्या राज्यस्तरीय 'आफताब-ए-सहाफत' (पत्रकारितेचा सूर्य) पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र खादिमीन-ए-उम्मतचे बीड जिल्हा निमंत्रक सय्यद मुमताज अली हाशमी, ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक नदीम मिर्झा तसेच ज्येष्ठ साहित्यिक अरशद सिद्दीकी यांच्या हस्ते बुधवारी देण्यात पान २ वर

# प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात

पाटोदा दि.१४(प्रतिनिधी):- पाटोद्याच्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती उत्सव मोठ्या उत्साहात सादर करण्यात आले.शाळेचे मुख्याध्यापक मोरे सरांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ ,स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. पान २ वर

# दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्र परिसर वृक्षलागवडी मुळे



पाटोदा दि १३ (प्रतिनिधी)- पाटोदा तालुक्यातील दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्र येथे गेल्या सहा महिन्यापासून वृक्ष व फुलांची लागवड झाल्याने आज हा परिसर बहारदार दिसत असून याचे संपूर्ण श्रेय वृक्ष लागवड करणारे सामाजिक कार्यकर्ते हरिदास शेलार यांना जात आहे.दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्र येथे सामाजिक कार्यकर्ते डॉ. हरिदास शेलार यांनी मागील सहा महिन्यांपासुन सातत्याने वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाचा स्तुत्य उपक्रम या प्राथमिक आरोग्य केंद्रात राबविला आहे पर्यावरण संरक्षणाची जाण ठेवून त्यांनी दवाखाना परिसरात विविध देशी वृक्षांची लागवड केली असून, आज या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहेत. पान २ वर

# १८ जानेवारीच्या शासकीय योजना महाशिबिरासाठी पाटोद्यात मंडप उभारणीचे काम सुरू

पाटोदा दि.१४(प्रतिनिधी):-१८ जानेवारी रोजी पाटोदा येथे आयोजित करण्यात येणाऱ्या शासकीय योजनांच्या महाशिबिरासाठी जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. आनंद एल. यावलकर यांच्या सूचनेनुसार तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीडचे सचिव मा. वहाब ए. सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली न्याय यंत्रणा व प्रशासनाच्या वतीने पूर्वतयारीला मोठा वेग आला असून कार्यक्रमाच्या तयारीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.



हे महाशिबिर पाटोदा येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात पार पडणार असून यासाठी माननीय उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तसेच जिल्हा न्यायाधीश व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत या शिबिरासाठी भव्य मंडप उभारणीचे काम सुरू आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी शासनाच्या विविध योजनांचे एकूण १४ ठिकाणी स्वतंत्र स्टॉल उभारण्यात येणार असून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध पान २ वर

# बाल लैंगिक अत्याचार प्रकरणात कोर्टाने ठोकली सुंदर तायड याला २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

बीड दि.१४ (प्रतिनिधी)–गेवराई तालुक्यातील रामपुरी येथील सहा वर्षांच्या चिमुकलीवरील अमानुष लैंगिक अत्याचार प्रकरणात अखेर न्याय मिळाला असून, दोषी आरोपीस बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने २० वर्षे सक्तमजुरीचा कारावास व २१ हजार रुपयांचा दंड अशी कठोर शिक्षा ठोकली . या निर्णयामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात समाधानाची भावना व्यक्त होत असून, बाललैंगिक अत्याचाराविरोधात न्यायालयाने कडक संदेश दिला आहे.



अ‍ॅड.नेहरकर

या बाबत अधिक माहिती अशी की, दि. ४ मे २०२२ रोजी रामपुरी येथील सहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची अमानुष घटना घडली होती. या प्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ४५२, ३७६, ३४ तसेच लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम (POCSO) २०१२ अंतर्गत कलम ४, ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात पान २ वर

# बबन सांगळे यांच्या डोक्यावर घेऊन सुवर्ण कलशाची भव्य मिरवणूक



पिंपळवंडी दि.१३ (प्रतिनिधी) :- पाटोदा तालुक्यातील चिंचोली (नाथ) येथील श्री.क्षेत्र गहिनीनाथ गड येथे संत वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी निमित्त मंदिराच्या शिखरावर सोन्याचा सुवर्णकलश बसवण्यात आला.या कलशाची गावात भव्य व भक्तिमय वातावरणात मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकीत सुर्वणकलश युवा उद्योजक तथा माजी सरपंच बबन सांगळे यांनी आपल्या डोक्यावर घेऊन संपूर्ण गावात प्रदक्षिणा घातली. ढोल,ताशे,टाळ-मृदंगाच्या गजरात व हरिनामाच्या जय घोषात ही मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडली.यावेळी ह.भ.प.विठ्ठल महाराज,सरपंच मारुती सांगळे यांच्या सह परिसरातील मान्यवर ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुवर्णकलश प्रतिष्ठापनेमुळे गहिनीनाथ गड परिसर भक्तीमय वातावरणाने भारावून गेला.

# स्वराज्यनिर्मितीचा पाया रोवला जिजाऊने-सज्जाद

पाटोदा दि.१४(प्रतिनिधी)- स्वराज्य निर्मितीसाठी राजमाता जिजाऊचे अमूल्य योगदान राहिले तसेच महिलांच्या शिक्षणा साठी सावित्रीबाई फुले व त्यांचे सहकारी शेख फातिमा यांनी मोठे परिश्रम घेतले त्यांचे आदर्श आजच्या पिढीने घेणं आवश्यक आहे असे प्रतिपादन सय्यद सज्जत यांनी चुंबळी येथे संयुक्तिक जयंती निमित्त बोलताना केले. चुंबळी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ ,शेख फातिमा व स्वामी विवेकानंद यांची संयुक्त जयंती मंगळवारी चुंबळी येथे साजरी करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते कॉमेंट महादेव नागरगोजे हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा सोसायटी संचालक सज्जाद भाई सय्यद यांनी विद्यार्थ्यांना जयंती विषयी बोलताना सांगितले की, राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ सावित्रीबाई फुले शेख फातिमा यांचे विचार मुलींनी अंगीकृत करणे गरजेचे काळाची गरज आहे . पान २ वर

# गेवराई गटशिक्षणाधिकारीपदी प्रवीण काळम यांची नियुक्ती

बीड दि.१४ (प्रतिनिधी):- गेवराई पंचायत समितीच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीणकुमार काळम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी १४ जानेवारी २०२६ रोजी प्रवीण कुमार काळम यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित केले आहेत.



प्रवीण कुमार कळम हे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी असून गुणवत्तेसाठी त्यांनी गेवराई मध्ये उल्लेखनीय काम केले आहे. जिल्हा व राज्यस्तरावर अनेक प्रशिक्षणासाठी काळम यांनी काम केले आहे. राज्यस्तरीय पान २ वर



वडवणी-प्रकाशदादा सोळंके यांना वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य देऊन वाढदिवस साजरा करताना वडवणी चे माजी सरपंच गंपूकाका पवार, बंजारा शक्ती महाराष्ट्र राज्याचे संतोष भैय्या पवार, राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष संपतराव चव्हाण, धनुशेठ जाधव, महादेवराव चव्हाण, शंकरराव चव्हाण दिसत आहेत.



आ. प्रकाशदादा सोळंके यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना माजी जिल्हा परिषद सदस्य औदुंबर सावंत, नगराध्यक्ष शेषराव जगताप, भारतदादा जगताप, नगरसेवक सचिन सानप ,नागेश डिगे, असलम कुरेशी, नवनाथराव म्हेत्रे, तालुका अध्यक्ष बजरंग साबळे, युवकचे तालुकाध्यक्ष विकास मुंडे, महादेव आबुरे,नाईकवाडे इत्यादी उपस्थित होते.

# तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी उगले सचिवपदी गायकवाड यांची निवड

माजलगाव (प्रतिनिधी):- मराठी पत्रकार परिषद मुंबई संलग्न तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी पांडुरंग उगले तर सचिवपदी राज गायकवाड यांची निवड करण्यात आली.सुभाष नाकलगावकर यांच्या यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि. १४ रोजी झालेल्या बैठकीत सर्वानुमते ही निवड करण्यात आली.मराठी पत्रकार परिषद सलग्न मुंबई

तालुका पत्रकार संघाचे हरीश यादव यांचा कार्यकाल पूर्ण झाल्याने पान २ वर






### त्रिदल आजी-माजी सैनिक संघटनेच्या वतीने न.प.चे पदाधिकारी व पत्रकारांचा संयुक्त सत्कार संपन्न

# निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार शहरात सैनिक भवन उभारण्यासाठी प्रयत्न करणार : नगराध्यक्षा चिंतामणी

जामखेड - जामखेड शहराचा विकास करताना नगराध्यक्षा व नगरसेवक जितके महत्त्वाचे आहेत, तितकेच पत्रकारही महत्त्वाचे आहेत. कारण नगरपरिषदेने केलेले चांगले काम आपल्या विविध माध्यमांमधून दाखवण्याचे काम हे पत्रकारांना करायचे आहे. त्यासाठी नगरपरिषदेच्या पदाधिकाऱ्यांना चांगले काम करावे लागणार आहे.

या दोन्ही घटकांनी जर चांगले काम केले तर जामखेड शहराचा विकास निश्चित आहे. अशा प्रकारे नगरपरिषदेचे पदाधिकारी व पत्रकारांचा त्रिदल आजी माजी सैनिक संघटनेने केलेला सत्कार हा खरंच कौतुकास्पद आहे. असे प्रतिपादन



ज्येष्ठ नेते व कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात यांनी केले. जामखेड नगर परिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विजयी झालेल्या नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष प्रांजल चिंतामणी व सर्वपक्षीय नगरसेवक तसेच पत्रकार दिनानिमित्त सर्व पत्रकारांचा सत्कार समारंभ जामखेड येथील त्रिदल आजी- माजी सैनिक पान २ वर